Since 1965
SONI TILES
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road,
Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of -
Ceramic Wall & Floor Tiles,
Vitrified Tiles, Paving Blocks,
Marble & Granite
सोनी टाईल्स अ‍ॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

स्विमिंग व थंडीसाठी
स्विमिंग सुट, कॅप, गॉगल्स, लेगीन्ज टॉप, बरमुडा...
थर्मल, जर्किन स्वेटर, ग्लोज, सॉक्स, मफलर, कानटोपी...
ब्रॅण्डेड उत्तम क्वालिटीची कंप्लीट रेंज.
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. २२.०६.२०२६ | अंक नं. ०७० | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹९९९/-*
2014 पासुन आपल्या सेवेत.. सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply

# हॉटेलच्या बिलावरून झालेल्या वादात एकाची चाकू भोसकून हत्या, तर दुसरा तरुण गंभीर

## नगर-पाथर्डी रोडवरील बारा बाभळी येथील घटना

नगर - नगर-पाथर्डी रस्त्यावरील बारा बाभळी परिसरातील शौर्य हॉटेलमध्ये २१ जून रोजी रात्रीच्या सुमारास पैशाच्या कारणावरून झालेल्या वादातून एका तरुणाची चाकू भोसकून निर्घृण हत्या करण्यात आली, तर दुसरा तरुण गंभीर जखमी झाला आहे. सागर गंगाधर धोत्रे (वय ३२) असे मयत तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी भिंगार येथील एका १६ वर्षीय अल्पवयीन आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

याबाबत निलेश धुराजी गायकवाड (वय ३२, रा. आलम गीर,भिंगार) याने फिर्याद दिली आहे. फिर्यादी हा त्याचे मित्र सागर गंगाधर धोत्रे आणि निलेश मधु चावरे यांच्यासोबत हॉटेलमध्ये जेवणासाठी गेला होता. जेवण झाल्यानंतर निलेश चावरे याने बिल भरले आणि सर्वजण काउंटरजवळ उभे राहिले. त्याच वेळी तेथे भिंगार येथील एक अल्पवयीन मुलगा हॉटेल मॅनेजरसोबत पैशाच्या कारणावरून वाद घालत होता. हा वाद मिटवण्यासाठी सागर धोत्रे याने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. मित्रा कशाला वाद करतो, त्यांचे पैसे देऊन टाक, असे सागर म्हणाला. यावरून संतापलेल्या त्या अल्पवयीन मुलाने सागरला शिवीगाळ करत त्याच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली.

हा वाद विकोपाला गेल्यानंतर त्या अल्पवयीन मुलाने स्वतः जवळील चाकू काढून आधी निलेश चावरे याच्या गळ्यावर वार करून त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्याने तोच चाकू सागर धोत्रे याच्या छातीत खुपसला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेला सागर जागीच रक्ताच्या थारोळ्यात कोसळला आणि बेशुद्ध झाला. जखमी निलेश चावरे याला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, तर सागर धोत्रे याला जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्याला उपचारापूर्वीच मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच पोलीस उपअधिक्षक डॉ. दिलीप टिपरसे, स.पो.नि. तेजश्री थोरात यांनी पोलीस पथकासह घटनास्थळी भेट देत पाहणी केली. या प्रकरणी पोलिसांनी एका १६ वर्षीय अल्पवयीन आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

# 'माहिती अधिकारा'चे नियम बदलल्याने ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे आक्रमक

## मुख्यमंत्र्यांना पाठविले पत्र; ५ जुलैपासून उपोषण करण्याचा इशारा



नगर - माहितीचा अधिकार हा शासनाने जनतेवर केलेला उपकार नसून तो नागरिकांचा घटनात्मक अधिकार आहे. मात्र, राज्य सरकारने १२ जून २०२६ रोजी प्रसिद्ध केलेले 'महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६' हे या कायद्याची धार बोथट करणारे आणि भ्रष्टाचाराला ढाल देणारे आहेत. प्रशासनातील ही हुकूमशाही मोडून काढण्यासाठी आणि माहितीचा अधिकार वाचवण्यासाठी मी माझ्या प्राणाची आहुती देण्यासही मागे हटणार नाही, असा थेट आणि निर्वाणीचा इशारा ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी राज्य सरकारला दिला आहे.

या संदर्भात अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक सविस्तर आणि कडक पत्र पाठवले असून, १२ जूनच्या बेकायदेशीर दुरुस्त्या त्वरित *(पुढील मजकूर पान २ वर)*

# गंज बाजार पोलीस चौकी लवकरच सुरू होणार; कोतवालीचे पो.नि. देशमुख यांच्याकडून पाहणी



गेल्या अनेक महिन्यांपासून बंद असलेली गंज बाजार पोलीस चौकी पाहणी करून परतताना कोतवालीचे पोनि. नितीन देशमुख. (छाया - धनेश कटारिया)

नगर - अहिल्यानगर शहरातील कोतवाली पोलीस ठाण्याच्या अंतर्गत असलेली गंज बाजार पोलीस चौकी गेल्या अनेक महिन्यांपासून बंद आहे. ही पोलीस चौकी मुख्य बाजारपेठेमध्ये आहे. त्यामुळे ही पोलीस चौकी सुरु करण्याची मागणी गेल्या अनेक दिवसांपासून नगरकर करीत होते. तथापि, २२ जून रोजी कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी गंज बाजार पोलीस चौकीची पाहणी केली आहे. तसेच ही पोलीस चौकी दुरुस्त करुन सुरु करण्याचा विचार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

शहरातील बाजारपेठेमध्ये कायम ग्राहकांची वर्दळ असते. गंज बाजार पोलीस चौकीला लागून सराफ बाजार, कापड बाजार, डाळ मंडई असा अत्यंत गजबजलेला परिसर आहे. बाजारपेठेत खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिकांची गर्दी असते. तसेच सराफ बाजारही तिथेच असल्यामुळे ही पोलीस चौकी सुरू राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या संदर्भात अनेक संघटनांनी वेळोवेळी निवेदन दिलेले आहेत. पोलीस चौकी सुरू राहिली तर गुन्हेगारीला आळा बसण्यास मदत होईल, अशी नागरिकांची मागणी आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस चौकी सुरू करण्यासाठी कोतवालीचे पोलीस निरीक्षक देशमुख यांनी केलेली पाहणी नागरिकांसाठी आशेचा किरण ठरली आहे. यावेळी देशमुख म्हणाले, लवकरच पोलीस चौकी दुरुस्त करून सुरू करण्यात येणार आहे. या परिसरातील अनेक गोष्टींना ही पोलीस चौकी सुरु झाल्यावर आळा बसेल. रस्त्यावर अतिक्रमणे करून व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करणेही ही पोलीस चौकी सुरु झाल्यानंतर शक्य होईल. नागरिकांना ये-जा करताना रस्त्यात अडथळे आणणाऱ्यांवर ही पोलीस चौकी सुरु झाल्यानंतर कारवाईची मोहिम राबविण्यात येईल, असेही देशमुख यांनी सांगितले.

कशाला घेता ३इन १ व ४ इन १ जेव्हा रु.५० मध्ये मिळतोय
लाभच लाभ शुभलाभ ६ इन १ ६ सुवासिक सुगंधासह
शुभलाभ बेस्ट ६
६ इन १ १२०ग्रॅम
रु. 65 चा रु. 50 मध्ये
तसेच केशर चंदन, इंडियन कस्तुरी
निळकंठ, अगरबत्तीचे विक्रेते
स्टॉ. केवल अगरबत्ती
रसरंग मिसळ समोर आडते बाजार अ.नगर

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे.
आकर्षक पगार
भेटा :
कोहिनूरसमोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

वीणा वर्ल्ड पैसा वसूल टुर्स
स्वप्नातील पर्यटन आता परवडणाऱ्या दरात!

| | |
|---|---|
| काश्मीर – 6 दिवस ₹49,000 ते ₹55,000 | राजस्थान – 6 दिवस ₹35,000 ते ₹40,000 |
| शिमला – मनाली – 7 दिवस ₹39,000 ते ₹44,000 | केरळ – 6 दिवस ₹35,000 ते ₹40,000 |
| अयोध्या – मथुरा – 4 दिवस ₹30,000 ते ₹35,000 | नैनीताल – मसुरी – 6 दिवस ₹45,000 ते ₹50,000 |
| इंदोर – उज्जैन – मांडू – 5 दिवस ₹39,000 ते ₹44,000 | भुवनेश्वर – पुरी – कोणार्क – 6 दिवस ₹49,000 ते ₹55,000 |
| जपान – 5 दिवस ₹1,75,000 ते ₹1,85,000 | अल्माटी – 5 दिवस ₹1,15,000 ते ₹1,20,000 |
| थायलंड – 4 दिवस ₹65,000 ते ₹70,000 | युरोप – 6 दिवस ₹1,69,000 ते ₹1,79,000 |

उत्कृष्ट नियोजन | अनुभवी टूर मॅनेजर | दर्जेदार सेवा | अविस्मरणीय अनुभव
बुकिंग व अधिक माहितीसाठी आजच संपर्क करा.
वीणा वर्ल्ड प्रेफर्ड सेल्स पार्टनर
राजलक्ष्मी हॉलिडेज्
कालिका प्राईड, २ रा मजला, ऑफिस नं. २०६, लालटाकी रोड, अहिल्यानगर
प्रसाद श्रीकांत मांढरे 9112384842 9850063432
"चला... बॅग भरा आणि निघा नवीन आठवणींच्या प्रवासाला!"

भावपूर्ण श्रध्दांजली
शून्यामधूनी विश्व निर्मुनी,
कीर्ती सुगंध वृक्ष फुलवूनी, लोभ,माया, प्रिती देवूनी,
सत्य सचोटी मार्ग दावूनी,
अमर जाहला तुम्ही जीवनी...
कै.रमेश रुपचंद अनभुले साहेब
दशक्रिया विधी : बुधवार दि.२४/०६/२०२६ रोजी
सकाळी ७.०० वा. ठिकाण : नालेगाव,अमरधाम,अ.नगर
शोकाकुल
डॉ. उषा रमेश अनभुले (पत्नी)
श्री. दिग्विजय रमेश अनभुले(मुलगा) | सौ. ऐश्वर्या गणेश पठारे (मुलगी)
श्री.गणेश भाऊसाहेब पठारे (जावई) | श्री. संजय रुपचंद अनभुले (भाऊ)
सौ. पूनम दिग्विजय अनभुले (सुन) | सौ.संगिता संजय अनभुले (भावजई )
श्री.जयदत्त संजय अनभुले (पुतण्या) | सौ.पूजा जयदत्त अनभुले (सून)
श्री.चारुदत्त संजय अनभुले (पुतण्या) | सौ.निता चारुदत्त अनभुले (सून)
समस्त अनभुले परिवार व आप्तेष्ट
ह.भ.प. संदीप महाराज कळसे (निंबळक) यांचे प्रवचन होईल.
श्री माधवराव लामखडे-व्याही. मा. जि. प. सदस्य | दत्तापाटील सप्रे-मेहुणे मा. सरपंच नागापूर
श्री रमाकांत गाडे (नाना) व्याही-उद्योजक | श्री भाऊसाहेब पठारे -व्याही पुणे
दिलीपराव मिस्कीन - साडू -उद्योजक
माधवराव लामखडे मित्र मंडळ -नगर तालुका

पाचवे पुण्यस्मरण
वैभव पाहण्याचे अधुरे सोडुनी, गेलात आपण निघुनी,
प्रसंगावरी मात करुनी निर्भयपणे जगणे गेलात सांगुनी
श्रध्दांजली एक दिवसाची आदरांजली आयुष्यभराची...!
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!
कै. शंकरराव भाऊसाहेब फुलारी (तात्या)
स्व. दि. २२/०६/२०२१
* शोकाकुल *
श्रीमती पार्वतीबाई शंकरराव फुलारी
श्री.गणेश शंकरराव फुलारी | सौ.वंदना गणेश फुलारी
सौ.लता रमेशराव शेरकर | सौ.सुनिता विजयराव नांदूरकर
श्रीमती संगीता अरविंदराव बनकर | सौ.सिमा रामदासराव रायकर
चि.तेजस गणेश फुलारी | डॉ.सौ.आकांक्षा सत्यम रायकर
समस्त फुलारी परिवार
सावेडी, अहिल्यानगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# हॉटेलमध्ये जेवायला गेलेल्या दोघांना चौघा जणांकडून बेदम मारहाण

नगर – नगर–पाथर्डी रस्त्यावरील बारा बाभळी परिसरातील शौर्य हॉटेलबाहेर बिल भरण्याच्या किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून एका तरुणाच्या डोक्यात हातातील कड्याने मारून गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना घडली. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात ४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


याबाबत अनिकेत रवींद्र भिंगारदिवे (वय २९, रा. पंचशीलनगर, भिंगार) याने फिर्याद दिली आहे. हे आपल्या मित्रांसह नगर–पाथर्डी रस्त्यावरील एका हॉटेलमध्ये जेवणासाठी गेले होते. जेवण झाल्यानंतर आणि हॉटेलचे बिल भरून ते सर्वजण बाहेर आले. त्या वेळी तिथे उपस्थित असलेल्या आरोपींनी, 'तुमची बिल भरायची लायकी नाही,' असे म्हणून फिर्यादीशी वाद घालण्यास सुरुवात केली.

हा वाद इतका वाढला की आरोपी अक्षय अर्जुन उबाळे, संदीप सिद्धार्थ उबाळे, योगेश सुमोथ उबाळे आणि ओंकार छत्रेकर यांनी फिर्यादी अनिकेत आणि त्यांचा मित्र प्रकाश यांना बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. या मारहाणीत आरोपींनी अनिकेत यांच्या डोक्यात हातातील कड्याने प्रहार केला, ज्यामुळे ते गंभीर जखमी झाले. तसेच त्यांचा मित्र प्रकाश यालाही लाथाबुक्यांनी मारहाण करून शिवीगाळ व दमदाटी करण्यात आली. या घटनेनंतर अनिकेत भिंगारदिवे यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी या तक्रारीवरून चारही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# उद्योगांना आवश्यक परवानग्या आणि मूलभूत सुविधा वेळेत उपलब्ध करून द्या

## जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांचे निर्देश; बैठकीत घेतला उद्योगविषयक सविस्तर आढावा

नगर – जिल्ह्यात औद्योगिक विकासाला अधिक गती देण्यासाठी उद्योगांना विविध विभागांकडून आवश्यक असलेल्या परवानग्या, ना हरकत प्रमाणपत्रे आणि इतर प्रशासकीय मंजुरी विहित कालावधीत उपलब्ध करून द्याव्यात. तसेच उद्योगांना वीज, पाणी, रस्ते यासह सर्व मूलभूत सुविधा विनाविलंब उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित उद्योगविषयक आढावा बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित उद्योगविषयक आढावा बैठकीत डॉ. पंकज आशिया बोलत होते. जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, औद्योगिक विकास हा जिल्ह्याच्या आर्थिक प्रगतीचा महत्त्वाचा आधार असून उद्योगवाढीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे ही प्रशासनाची प्राथमिकता आहे. नवीन उद्योगांना प्रोत्साहन देतानाच विद्यमान उद्योगांच्या अडचणी दूर करणेही तितकेच आवश्यक आहे. त्यामुळे सर्व विभागांनी उद्योगस्नेही दृष्टीकोन ठेवून कार्य करावे आणि प्रलंबित विषयांवर कालबद्ध कार्यवाही करण्याच्या सुचनाही त्यांनी यावेळी केल्या. उद्योगवाढीसाठी आवश्यक असलेल्या प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करण्यावर भर देत विविध विभागांनी उद्योगांच्या प्रस्तावांबाबत सकारात्मक भूमिका घ्यावी. उद्योगांना आवश्यक मंजुरी व परवानग्या वेळेत मिळाल्यास नवीन गुंतवणुकीला चालना मिळेल आणि रोजगारनिर्मिती वाढण्यास मदत होईल, असेही ते म्हणाले.

औद्योगिक वसाहतींमधील पायाभूत सुविधांचा आढावा घेताना जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, ड्रेनेज व्यवस्था, अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा पाईपलाईन, सांडपाणी व्यवस्थापन, वीज वितरण व्यवस्था तसेच इतर आवश्यक नागरी सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्यात याव्यात. औद्योगिक क्षेत्रांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी एमआयडीसी आणि संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करून प्रलंबित कामांना गती द्यावी, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

बैठकीत उद्योजकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी व निवेदनांवर सात दिवसांमध्ये कार्यवाही करून त्यांचे निराकरण करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

# अशोक कोतकर यांना बायोडिझेल प्रकरणात न्यायालयाचा मोठा दिलासा

## गुन्ह्यातून नाव वगळण्याचा आदेश

नगर – केडगाव येथे गाजलेल्या बायोडिझेल प्रकरणात आरोपी करण्यात आलेले अशोक हरिभाऊ कोतकर यांना जिल्हा न्यायालयाकडून दिलासा मिळाला आहे. प्रधान जिल्हा व सत्र न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाचा आदेश रद्द करत पुनर्निरीक्षण अर्ज मंजूर केला असून कोतकर यांना संबंधित गुन्ह्यातून वगळण्याचे आदेश दिले आहेत.

कोतवाली पोलीस ठाण्यात २०२१ मध्ये जीवनावश्यक वस्तू कायदा, स्फोटक पदार्थ कायदा आणि पेट्रोलियम कायद्यातील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात केडगाव येथील काही प्रतिष्ठित, राजकीय व व्यापारी क्षेत्रातील व्यक्तींना आरोपी करण्यात आले होते. बेकायदेशीररीत्या बायोडिझेलसदृश इंधन विक्री करून शासनाची फसवणूक केल्याचा आरोप या गुन्ह्यात करण्यात आला होता.

या प्रकरणाचा तपास करून कोतवाली पोलिसांनी जिल्हा न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. मात्र अशोक हरिभाऊ कोतकर यांच्याविरुद्ध कोणताही सबळ व ठोस पुरावा उपलब्ध नसल्याचा दावा बचाव पक्षाने केला. कोतकर यांचा या गुन्ह्याशी कोणताही संबंध नसल्याचे नमूद करत त्यांच्या वतीने ॲड. सचिन पाठक यांनी कनिष्ठ न्यायालयात डिस्चार्ज अर्ज दाखल केला होता. मात्र तो अर्ज नामंजूर करण्यात आला होता. यानंतर ॲड. सचिन पाठक यांनी जिल्हा व सत्र न्यायालयात पुनर्निरीक्षण अर्ज दाखल केला. यावेळी त्यांनी कनिष्ठ न्यायालयाने अर्ज नामंजूर करताना केलेल्या त्रुटी तसेच दोषारोपपत्रातील पुराव्यांतील कमतरता न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या. अशोक कोतकर हे केडगाव येथील व्यावसायिक असून त्यांचा कथित बायोडिझेल विक्रीशी किंवा इतर आरोपींना मदत केल्याशी संबंध जोडणारा कोणताही ठोस पुरावा उपलब्ध नसल्याचा युक्तिवाद त्यांनी केला.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि उपलब्ध पुराव्यांचा विचार करून प्रधान जिल्हा व सत्र न्यायालयाने कोतकर यांच्याविरोधात प्रथमदर्शनी ठोस पुरावा नसल्याचे नमूद केले. त्यानुसार कनिष्ठ न्यायालयाचा आदेश रद्द करून पुनर्निरीक्षण अर्ज मंजूर करण्यात आला आणि अशोक हरिभाऊ कोतकर यांना संबंधित गुन्ह्यातून वगळण्याचा आदेश देण्यात आला.

या प्रकरणात आरोपी अशोक हरिभाऊ कोतकर यांच्या वतीने ॲड. सचिन पाठक यांनी कामकाज पाहिले.

## शमीम बागवान यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

नगर – शहरातील कालू बागवान गल्ली, धरती चौक येथील



शमीम उमर बागवान (वय ८०) यांचे नुकतेच हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर हसन शाह कादरी कब्रस्तानमध्ये दफन विधी करण्यात आला. याप्रसंगी विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. त्या धार्मिक व मनमिळावू स्वभावाच्या होत्या.

त्यांच्यामागे तीन मुले, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने नातेवाईक व परिसरामध्ये हळहळ व्यक्त होत आहे. सामाजिक कार्यकर्ते समीर बागवान, इमरान व शकूर बागवान यांच्या त्या आई होत.

# अहिल्यानगरच्या औद्योगिक विकासासाठी मोठा प्रकल्प आणावा

## जयंत येलुलकर यांची प्रधान सचिव अनबलगन यांच्याकडे मागणी

नगर – अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असताना जिल्ह्यातील विविध प्रश्नांमध्ये कर्तव्यभावनेने लक्ष घालणारे आणि शहराच्या ऐतिहासिक वारशाबद्दल विशेष आत्मीयता बाळगणारे उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अन्बलगन यांच्याकडे अहिल्यानगरच्या औद्योगिक विकासासाठी मोठा उद्योग प्रकल्प आणण्याची मागणी रसिक ग्रुपचे अध्यक्ष तथा माजी नगरसेवक जयंत येलुलकर यांनी केली.

मुंबई येथील मंत्रालयात झालेल्या भेटीत येलुलकर यांनी डॉ. अन्बलगन यांना अहिल्यानगरशी असलेल्या त्यांच्या जिव्हाळ्याच्या नात्याची आठवण करून दिली. जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असताना त्यांनी ऐतिहासिक वारसा लाभलेल्या अहिल्यानगर शहरातील भुईकोट किल्ल्याच्या संवर्धन आणि सुशोभीकरणासाठी विशेष पुढाकार घेतला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळे किल्ल्याच्या विकासासाठी शासनामार्फत निधी उपलब्ध झाला होता.

येलुलकर यांनी शहरासमोरील बेरोजगारीचा प्रश्न मांडला. एकेकाळी औद्योगिक आणि व्यावसायिकदृष्ट्या गजबजलेल्या अहिल्यानगरमधील अनेक तरुण रोजगाराच्या शोधात इतर शहरांमध्ये आणि राज्यांमध्ये स्थलांतरित होत आहेत. परिणामी शहराची ओळख हळूहळू पेन्शनरांचे शहर अशी निर्माण होत असून अनेक उपनगरे तरुणांच्या अभावामुळे ओस पडत चालल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

अहिल्यानगरमधील तरुणांना स्थानिक स्तरावर रोजगार उपलब्ध व्हावा, लघु व मध्यम उद्योजकांना कामाच्या संधी निर्माण व्हाव्यात आणि शहराच्या आर्थिक विकासाला चालना मिळावी यासाठी एमआयडीसी परिसरात मोठा उद्योग प्रकल्प उभारण्याचा पाठपुरावा करावा, अशी विनंती त्यांनी डॉ. अनबलगन यांच्याकडे केली. अशा प्रकल्पामुळे चार ते पाच हजार तरुणांना रोजगार उपलब्ध होऊन शहराला नवसंजीवनी मिळेल, असे त्यांनी सांगितले.

अहिल्यानगरच्या औद्योगिक प्रगतीसाठी डॉ. पी. अनबलगन निश्चितच सकारात्मक भूमिका घेतील आणि शहराच्या विकासासाठी आवश्यक ते सहकार्य करतील, असा विश्वास जयंत येलुलकर यांनी व्यक्त केला.




मुंबई येथील मंत्रालयात उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अन्बलगन यांची भेट घेऊन सत्कार करताना रसिक ग्रुपचे अध्यक्ष जयंत येलुलकर.

### हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष व ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

## प्रा. शिरीष मोडक यांचे निधन

नगर – हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष व ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा.



शिरीष दामोदर मोडक (वय ७२) यांचे २१ जून रोजी रात्री पुण्यात खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. शतकोत्तर वर्ष पार केलेल्या हिंद सेवा मंडळ व अहिल्यानगर जिल्हा वाचनालय या दोन्ही ऐतिहासिक संस्थांचे ते अध्यक्ष होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, पत्नी, सून व जावई असा परिवार आहे. नगरच्या अमरधाममध्ये त्यांच्यावर शोकाकुल वातवरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.

स्व. प्रा. शिरीष मोडक हे जिल्ह्यात मोडक गणित व विज्ञान क्लासेस साठी प्रसिद्ध होते. त्यांनी शैक्षणिक व साहित्य क्षेत्रात भरीव योगदान दिले. १९८० सालापासून ते हिंद सेवा मंडळ या शैक्षणिक संस्थेचे संचालक तसेच कार्याध्यक्ष व गेल्या १० वर्षांपासून अध्यक्षपदी कार्यरत होते. या माध्यमातून संस्थेला प्रगती पथावर नेत हजारो विद्यार्थी घडवले. स्व. मोडक हे शहरातील ऐतिहासिक अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाचे २००६ सालापासून अध्यक्ष होते. साहित्य क्षेत्रातही त्यांनी भरीव योगदान दिले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नगर शाखेचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली होती. स्व. मोडक यांच्या शैक्षणिक व साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल अनेक नावाजलेल्या संस्थांनी त्यांना पुरस्कार देऊन सन्मान केला होता.

# 'माहिती अधिकारा'चे नियम बदलल्याने अण्णा हजारे आक्रमक

(पान १ वरुन)

रद्द न केल्यास ५ जुलै २०२६ पासून राळेगणसिद्धी येथील यादवबाबा मंदिरात आमरण उपोषण सुरू करणार असल्याचा इशारा दिला आहे.

अण्णा हजारे यांनी पत्रात नमूद केले आहे की, १९९८ पासून त्यांनी माहितीच्या अधिकारासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर दौरे केले आणि अनेकदा ऐतिहासिक उपोषणे केली. मात्र, २० वर्षांनंतर सरकारने केलेल्या नवीन दुरुस्त्या या कायद्याचा मूळ आत्माच नष्ट करणाऱ्या आहेत. जनतेला विश्वासात न घेता हे नियम तयार करण्यात आले असून, यामुळे 'माहिती देणे अपवाद आणि माहिती नाकारणे हाच नियम' अशी उलटी परिस्थिती निर्माण होईल, अशी भीती अण्णा हजारे यांनी व्यक्त केली आहे.

## अण्णा हजारे यांनी पत्रात आक्षेप घेतलेले '९' प्रमुख मुद्दे

ओळखपत्र जोडण्याची बेकायदेशीर सक्ती : कायद्याच्या कलम ६(२) नुसार अर्जदाराला वैयक्तिक तपशील देण्याची गरज नाही. ओळखपत्र सक्तीचे केल्याने माहिती मागणाऱ्यांची गोपनीयता धोक्यात येईल आणि भ्रष्टाचार उघड करणाऱ्या 'व्हिसलब्लोअर्स'च्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होईल.

माहिती मागण्याचे कारण विचारणे : लोकशाहीत नागरिक मालक आणि शासन लोकसेवक आहे. नागरिकाने माहिती का मागितली याचा जाब विचारण्याचा अधिकार अधिकाऱ्यांना नाही. यामुळे अधिकारी मनमानी पद्धतीने अर्ज फेटाळू शकतात.

तर्कहीन शुल्कवाढ : आरटीआय हा महसूल गोळा करण्याचा कायदा नाही. जर नागरिकांवर आर्थिक भार वाढवला, तर माहिती न देणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांच्या दंडाची रक्कम का वाढवली नाही? हा एकतर्फी अन्याय आहे.

'एक विषय – एक अर्ज'ची जाचक अट : प्रशासकीय निर्णय एकमेकांशी जोडलेले असतात. या अटीमुळे सर्वसामान्य नागरिकांना एकाच कामासाठी अनेक अर्ज करावे लागतील, ज्यामुळे वेळ आणि पैसा दोन्ही वाया जाईल.

पुनरावृत्ती अर्ज निकाली काढण्याची तरतूद : अनेकदा अधिकारी अपूर्ण किंवा खोटी माहिती देतात. अशा वेळी पुन्हा अर्ज करावा लागतो. केवळ पूर्वी माहिती दिली होती हे कारण पुढे करून अर्ज फेटाळणे म्हणजे भ्रष्टाचाराला पाठीशी घालण्यासारखे आहे.

सुनावणीला गैरहजर राहिल्यास अपील फेटाळणे : कामाच्या व्यापामुळे किंवा नोटीस उशिरा मिळाल्याने नागरिक गैरहजर राहू शकतात. अशा वेळी उपलब्ध कागदपत्रांवरून निकाल देण्याऐवजी अपील थेट निकाली काढणे दोषी अधिकाऱ्यांच्या पथ्यावर पडणारे आहे.

अर्जदाराच्या मृत्यूनंतर केस बंद होणे : सुनावणी प्रलंबित असताना अर्जदाराचा मृत्यू झाल्यास केस बंद करण्याचा नियम अत्यंत चुकीचा आहे. कोर्टाप्रमाणेच येथेही त्यांच्या वारसांना केस चालवण्याचा अधिकार मिळाला पाहिजे.

वकिलांची मदत घेण्यास बंदी : माहिती आयोग ही एक अर्ध–न्यायिक संस्था आहे. सर्वसामान्य नागरिकांना कायदेशीर क्लिष्टता समजत नाही. अशा वेळी त्यांना वकिलांची मदत घेण्यापासून रोखणे म्हणजे न्याय नाकारण्यासारखे आहे.


'सुओ–मोटो' (कलम ४) कडे दुर्लक्ष : शासनाने स्वतःहून सर्व माहिती (अर्थसंकल्प, निविदा, खर्च) वेबसाईटवर अद्ययावत केली, तर नागरिकांना अर्ज करण्याची गरजच पडणार नाही. मात्र, या मूळ त्रुटी दूर करण्याऐवजी नागरिकांवरच निर्बंध लादले जात आहेत.

### महाराष्ट्राचा आदर्श पायदळी तुडवू नका

२००२ मध्ये महाराष्ट्राने देशात सर्वप्रथम आदर्श माहिती अधिकार कायदा करून देशाला दिशा दाखवली होती. आज त्याच महाराष्ट्रात असे काळे कायदे लागू होत आहेत. याचे अनुकरण इतर राज्यांनी केल्यास देशातील पारदर्शकता संपुष्टात येईल, अशी खंत अण्णांनी व्यक्त केली. मुख्यमंत्र्यांनी तात्काळ हस्तक्षेप करून या जाचक तरतुदी मागे घ्याव्यात, अन्यथा ५ जुलैपासून राळेगणसिद्धीमध्ये पुन्हा एकदा आंदोलनाची ठिणगी पडेल, असे अण्णा हजारे यांनी पत्राच्या शेवटी ठणकावून सांगितले आहे.

## संतोष कानडे यांचे दु:खद निधन

नगर – सुदर्शन कॉलनी, शिवनगर, जुना पिंपळगाव, पाईपलाईन रोड येथील रहिवासी संतोष दत्तात्रय कानडे (वय ५४) यांचे २० जून रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, १ भाऊ, १ मुलगा, मुलगी, भावजय, पुतणे, पुतण्या असा परिवार आहे. उपमहापौरांचे स्वीय सहाय्यक किशोर कानडे यांचे ते बंधू होत.



## कल्याणीताई कवडे यांचे दु:खद निधन

नगर – वाघगल्ली, नालेगाव येथील रहिवासी सौ. कल्याणीताई सुनील कवडे (वय ४५) यांचे २१ जून रोजी दु:ख निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पती, दीर, भावजया, २ मुले, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सहाय्यक फौजदार सुनील कवडे यांच्या त्या पत्नी होत.

## चंद्रकांत कदम यांचे अल्प आजाराने निधन

नगर – कौठा निमगाव (ता.श्रीगोंदा) येथील चंद्रकांत महादेव कदम (वय ७५) यांचे २१ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर कौठा भीमानदी काठी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. दिलीप व उत्तम कदम यांचे ते वडील होत.



# तारकपूर येथे हॉटेल व्यावसायिकाला लाकडी दांडक्याने बेदम मारहाण

नगर – शहरातील तारकपूर भागातील सिंधी कॉलनी येथे महानगरपालिकेने केलेल्या सिमेंट रस्त्याच्या पाण्याचा उतार आपल्या घराच्या जवळ काढल्याचा राग मनात धरून दोन व्यक्तींनी एका हॉटेल व्यावसायिकाला आणि त्यांच्या मुलाला बेदम मारहाण केल्याची घटना २० जून रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास घडली आहे.याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत जगजीतसिंग किशनसिंग गंभीर (वय ५३, रा. सिंधी कॉलनी, तारकपूर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे २० जून रोजी रात्री अकरा वाजेच्या सुमारास आपल्या घरासमोर उभे होते. त्याच वेळी तिथे राहणारे विकी कुकरेजा आणि नरेंद्र छाबरिया हे दोघे फिर्यादी यांच्या जवळ आले. महानगरपालिकेने तयार केलेल्या सिमेंट रस्त्याच्या पाण्याचा उतार माझ्या घराजवळ का काढला, असा जाब विचारत त्यांनी वाद घालण्यास सुरुवात केली.

हा वाद इतका वाढला की, संतापलेल्या विकी कुकरेजा याने जगजीतसिंग गंभीर यांना लाकडी दांडक्याने दोन्ही हातांवर बेदम मारहाण करून जखमी केले.

याच दरम्यान फिर्यादीचा मुलगा सोनू गंभीर हा वाद सोडवण्यासाठी मध्यस्थी करण्यासाठी आला असता, दुसरा आरोपी नरेंद्र छाबरिया याने त्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि शिवीगाळ करत जीवे मारण्याची दमदाटी केली. या घटनेनंतर जखमी फिर्यादी यांना उपचारासाठी तातडीने सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.

जगजीतसिंग गंभीर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिसांनी आरोपी विकी कुकरेजा आणि नरेंद्र छाबरिया यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दळवी करत आहेत.

# व्हॉट्सप ग्रुपवर मेसेज टाकल्याने बांधकाम व्यावसायिकाला मारहाण

नगर – शहरातील तारकपूर भागातील सिंधी कॉलनीमध्ये एका व्हॉट्सप ग्रुपवर पिसाळलेल्या कुत्र्याबाबत सतर्कतेचा मेसेज टाकल्याच्या कारणावरून एका बांधकाम व्यावसायिकाला चौघांनी बेदम मारहाण केल्याची घटना २० जून रोजी रात्री ११.१८ वाजण्याच्या सुमारास घडली आहे.याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत विकी अशोक कुकरेजा (वय ३३, रा. सिंधी कॉलनी, ताराकपूर)यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कुकरेजा यांनी त्यांच्या प्रभागातील 'सिंधी कॉलनी प्रभाग क्रमांक पाच' या व्हॉट्सप ग्रुपवर एक मेसेज टाकला होता. त्यात त्यांनी परिसरात एक पिसाळलेला कुत्रा फिरत असून सर्वांनी दक्षता घ्यावी, अशी विनंती केली होती.

या मेसेजचा राग धरून आरोपी जितू गंभीर, कुणाल गंभीर, सोनू गंभीर आणि चिंटू गंभीर यांनी कुकरेजा यांना गाठले. आरोपींनी कुकरेजा यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करत शिवीगाळ केली आणि जीवे मारण्याची धमकी दिली. एवढ्यावरच न थांबता आरोपींनी हातातील कडे आणि कुकरी या हत्यारांनी कुकरेजा यांच्या चेहऱ्यावर आणि खांद्यावर सपासप वार केले.

या हल्ल्यात कुकरेजा गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने नोबल हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी आणि इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. या प्रकरणी पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास पोलीस हवालदार दीपक गांगर्डे करत आहेत.

# बुऱ्हाणनगर ते नागरदेवळे रोडवरील जुगार अड्ड्यावर छापा

## ११ जणांवर गुन्हा दाखल, १ लाख ८ हजारांचा मुद्देमाल जप्त

नगर – भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या पथकाने बुर्हाणनगर ते नागरदेवळे रोडलगत असलेल्या शेडमध्ये पहाटेच्या वेळी सुरु असलेल्या बेकायदा जुगार अड्ड्यावर छापा टाकून ११ जणांना पकडले. त्यांच्याविरूध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत रोख रक्कम व मोबाईल फोन असा एकूण सुमारे १ लाख ८ हजार ६४० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

बुऱ्हाणनगर ते नागरदेवळे जाणाऱ्या रस्त्यालगतच्या शेडमध्ये काही व्यक्ती विनापरवाना पैशांवर तिरट नावाचा हारजीतीचा जुगार खेळत असल्याची माहिती भिंगार कॅम्पच्या महिला सहायक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांना मिळाली होती.

त्यानुसार कॅम्प पोलीस ठाण्याच्या पथकाने घटनास्थळी २० जून रोजी पहाटे १.२० वाजण्याच्या सुमारास धाड टाकली असता ११ संशयित जुगार खेळताना आढळून आले. या प्रकरणी पोलीस अंमलदार भागवत जायभाय यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### डोळ्यांची जळजळ होत असेल तर

डोळ्यांची जळजळ हा हल्ली लहान-मोठ्या सगळ्यांना होणारा त्रास आहे. भ्रमणध्वनी, संगणकाचा वापर, उन्हात फिरणं, धूळ किंवा शरीरातली उष्णता वाढली की डोळे लाल होतात, आग होते आणि पाणी यायला लागतं. अशावेळी फक्त डोळ्यात थेंब टाकून भागत नाही, तर आतून शरीर थंड ठेवणं गरजेचं असतं. आपल्या रोजच्या आहारात काही विशिष्ट भाज्यांचा समावेश केला तर डोळ्यांना नैसर्गिकरित्या आराम मिळतो. गाजर ही डोळ्यांसाठी सगळ्यात चांगली भाजी मानली जाते कारण त्यात बीटा-कॅरोटीन भरपूर असतं ज्याचं शरीरात जीवनसत्त्व 'अ' मध्ये रूपांतर होतं आणि डोळ्यांचा कोरडेपणा कमी होतो. त्याचबरोबर पालक, मेथी सारख्या हिरव्या पालेभाज्यांमध्ये ल्युटीन आणि झिक्सॅन्थिन नावाची द्रव्य असतात जी डोळ्यांना सूर्याच्या हानिकारक किरणांपासून वाचवतात. काकडी आणि दुधी भोपळा अंगी थंड असतात, ते खाल्ल्याने शरीरातलं पाण्याचं प्रमाण वाढतं आणि उष्णतेमुळे होणारी जळजळ शांत होते. भोपळा आणि रताळं यातही जीवनसत्त्व 'अ' मुबलक असतं, त्यामुळे डोळ्यांच्या नसांना ताकद मिळते. ढोबळी मिरची आणि टोमॅटो मधलं जीवनसत्त्व 'क' डोळ्यांतील रक्तवाहिन्या मजबूत करतं आणि टोमॅटोमधलं लायकोपीन डोळ्यांचं नुकसान होण्यापासून वाचवतं. फक्त भाज्या खाऊन उपयोग नाही, सोबत दिवसातून तीन ते चार वेळा थंड पाण्याने डोळे धुणे आणि पडद्यावर काम करताना वीस-वीस-वीस चा नियम पाळणेही तितकंच महत्वाचं आहे.

## पाककला

### खारी पॅटीस

**साहित्य :** पारी: मैदा, मीठ, तेल, थंड पाणी, तूप, कॉर्नफ्लोअर, उकडलेला बटाटा, कांदा, मटार, हिरवी मिरची, आलं-लसूण पेस्ट, हळद, तिखट, गरम मसाला, आमचूर, कोथिंबीर, मीठ

**कृती :** कांदा, मिरची, आलं-लसूण परतून उकडलेला बटाटा, मटार, मसाले घालून कोरडं सारण बनवा आणि थंड करा. मैदा, मीठ, तेल घालून घट्ट कणिक भिजवा. तूप + कॉर्नफ्लोअरचा साठा बनवा. कणकेच्या पातळ पोळ्या लाटून प्रत्येकीवर साठा लावत एकावर एक रचून रोल करा. रोलचे तुकडे कापून पुरी लाटा, सारण भरून त्रिकोनी बंद करा. बेक करा किंवा मंद आचेवर सोनेरी तळा. चटणी सोबत गरम वाढा.

## वास्तू

### घराचा हॉल

✲ हॉलचे मुख्य प्रवेशद्वार शक्यतो उत्तर किंवा पूर्व दिशेला असावे कारण या दिशेने येणारी सकारात्मक ऊर्जा आणि सकाळचे सूर्यप्रकाश घरात समृद्धी आणतात.

✲ घरातील कर्त्या व्यक्तीने हॉलमध्ये बसताना दक्षिण किंवा पश्चिम भिंतीला पाठ करून उत्तर किंवा पूर्वेकडे तोंड करून बसावे, यामुळे निर्णयक्षमता आणि सामाजिक प्रतिष्ठा वाढते.

✲ सोफा आणि इतर जड फर्निचर दक्षिण किंवा पश्चिम भिंतीला लागून ठेवावे आणि उत्तर व पूर्वेच्या भिंती मोकळ्या ठेवाव्यात जेणेकरून धन आणि संधींचा प्रवाह अडणार नाही.

## सौंदर्य

✲ ओले केस जोरात पुसू नका, टॉवेलने हलकेच दाबून पाणी टिपा. ओल्या केसांवर कंगवा फिरवू नका, बोटांनी गुंता सोडवा.

✲ रोज स्ट्रेटनर, कर्लर, ड्रायर वापरू नका. उष्णतेमुळे केस तुटतात. घट्ट पोनीटेल किंवा अंबाडा बांधू नका, मुळे कमजोर होतात. २-३ महिन्यांनी केसांची टोके कापा, दुभंगलेले केस निघून जातील.

## सल्ला

✲ मिक्सरचे ब्लेड धारदार राहण्यासाठी महिन्यातून एकदा खडेमीठ वाटा.

✲ सिलिंडरच्या पाईपवर साबणाच्या पाण्याने फुगे येतात का ते तपासा, गॅस लिकेज कळते.

**संकलक :** ॲड. सौ. पूजा गुंदेचा

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. २३ जून २०२६

**महेश नवमी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, निज ज्येष्ठ शुक्लपक्ष, हस्त ११।५४, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०५ वा. ३७ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** आज दिवसभर उत्साह राहील. अचानक काम येईल. संध्याकाळी गर्दी टाळाल.

**वृषभ :** पैशाची आवक-जावक होईल. जुन्या वस्तूची आठवण येईल. चवदार जेवण मिळेल.

**मिथुन :** फोनवर बोलणे वाढेल. छोटा प्रवास घडेल. मनात नवे प्लॅन येतील.

**कर्क :** घरातील व्यक्ती जवळ येईल. भावनांचा पूर येईल. रात्री लवकर झोप लागेल.

**सिंह :** लोकांचे लक्ष तुमच्याकडे राहील. खर्चावर नियंत्रण सुटेल. आरशात जास्त पाहाल.

**कन्या :** याद्या करून काम कराल. तब्येतीची कुरकुर जाणवेल. नीटनेटकेपणा दिसेल.

**तूळ :** जोडीदार/मित्रासोबत वेळ जाईल. खरेदीचा मूड होईल. वादापासून दूर राहाल.

**वृश्चिक :** मनातली गोष्ट बाहेर येईल. झोप अपूर्ण राहील. गूढ विषयात रस वाटेल.


**धनु :** लांबचा फोन/मेसेज येईल. शिकण्याची इच्छा होईल. मोकळेपणा वाटेल.

**मकर :** कामाचा डोंगर समोर दिसेल. कौतुक न होता जबाबदारी वाढेल. उशिरापर्यंत जागाल.

**कुंभ :** वेगळी कल्पना डोक्यात येईल. सोशल मीडियावर वेळ जाईल. मित्राचा मेसेज येईल.

**मीन :** दिवस स्वप्नात जाईल. गाणं गुणगुणाल. एकांतात शांतता मिळेल.

## शब्दगंध क्र. ७४५७ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) शहाणा; समज असलेला ; जाणकार ५) दात; सुळे ६) एक महसूल अधिकारी १०) प्रश्न ११) धन; वित्त १२) परीक्षा; चाचणी; सत्त्व १३) एक अरबी देश व त्या देशाच्या भाषेत रांग किंवा ओळ १४) कवच; आवरण; साल १६) अधर्म; पातक १८) त्रास; परेशानी २१) ओढा; रोख; झोक २२) ताजा; टवटवीत २४) केस गळाल्यामुळे डोक्याचा उघडा पडणारा भाग २५) भास्कर; रवि; सूर्य

**उभे शब्द :-** १) एकंदरीत; निवड न करता २) शनी ग्रह हळू फिरतो म्हणून त्यावरून शनिवारला असेही नाव पडले आहे ३) पूर्ण भरतीची वेळ ४) शरीर; देह; तनू ७) प्रेम; माया ८) नोकर; चाकर; पाईक ९) रड; रडगाणे १३) लहान मुलांचा किंवा पक्ष्यांचा गलका १५) ऐसपैस घातलेली मांडी १७) विनोबा भावे यांचा विदर्भातील आश्रम १९) मुस्लीम धर्मगुरूने काढलेला आदेश २०) शेतातील विहिरीतून पाणी काढण्याचे पूर्वीच्या काळातील एक साधन २३) धागा; तंतू; दोरा

### शब्दगंध क्र. ७४५६ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | सा | म | ■ | दा | स | बो | ध |
| ज | न | क | ज | न | नी | ■ | न |
| का | ■ | रं | ग | त | ■ | दि | वा |
| ल | वा | द | ■ | ■ | ज | वा | न |
| ■ | च | ■ | झ | गा | ■ | क | ■ |
| ब | ना | व | ट | ■ | स | र | की |
| ग | ल | ■ | प | र | वा | ■ | र्त |
| ल | य | लू | ट | ■ | ल | हा | न |

# ✲ ✲ ✲ ✲ ✲ ✲ मुलांचे विश्व ✲ ✲ ✲ ✲ ✲ ✲

**सुविचार :** लोक काय म्हणतील याचा विचार केला, तर लोक तेच म्हणतील जे त्यांना वाटेल.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### विमान एवढे जड असूनही हवेत तरंगते कसे?

आपण जेव्हा विमानतळावर उभे राहून शेकडो टन वजनाचे अवाढव्य विमान सहजपणे आकाशात झेप घेताना पाहतो, तेव्हा मनात एकच प्रश्न येतो – इतके जड विमान हवेत तरंगते तरी कसे? लहानसा दगडसुद्धा पाण्यात टाकला तर बुडतो, मग हे धातूचे महाकाय यंत्र हवेत कसे राहते? हा चमत्कार नसून विज्ञानाचा एक सुंदर नियम आहे. विमान हवेत उडणे हे फक्त इंजिनच्या ताकदीवर अवलंबून नसून हवेचा दाब, पंखांचा आकार आणि गती यांच्या अचूक समतोलावर अवलंबून असते. चला, हीच गोष्ट ३०-४० ओळीत सोप्या भाषेत समजून घेऊया. विमान हवेत कसे तरंगते? विमान उडण्यासाठी चार मुख्य बळे काम करतात – लिफ्ट, वजन, थ्रस्ट आणि ड्रॅग. यापैकी 'लिफ्ट' नावाचे वरच्या दिशेने काम करणारे बळ विमानाला हवेत ठेवते. विमानाचे पंख सरळ सपाट नसतात. त्यांचा वरचा भाग थोडा फुगीर आणि खालचा भाग तुलनेने सपाट असतो. याला 'एअरोफॉइल' आकार म्हणतात. जेव्हा विमान धावपट्टीवर वेगाने धावते, तेव्हा हवा पंखांच्या वरून आणि खालून जाते.

पंखाच्या वरच्या फुगीर भागावरून हवेला जास्त अंतर कापावे लागते, त्यामुळे तिथली हवा वेगाने जाते. विज्ञानाच्या 'बर्नौली तत्वानुसार' जिथे हवेचा वेग जास्त, तिथे हवेचा दाब कमी होतो. त्यामुळे पंखाच्या वर हवेचा दाब कमी होतो आणि पंखाखाली हवेचा दाब तुलनेने जास्त राहतो. हा खालून वर ढकलणारा जास्तीचा दाबच विमानाला वर उचलतो. यालाच 'लिफ्ट' म्हणतात.

जेव्हा ही लिफ्ट विमानाच्या वजनापेक्षा जास्त होते, तेव्हा विमान जमीन सोडून हवेत झेपावते. विमानाचे शक्तिशाली इंजिन 'थ्रस्ट' नावाचे बळ निर्माण करते आणि विमानाला प्रचंड वेगाने पुढे ढकलते. हा वेगच पंखांवरून हवा जलद वाहण्यासाठी आवश्यक असतो. पुरेसा वेग नसेल तर लिफ्ट तयार होणार नाही आणि विमान उडणार नाही.

म्हणूनच विमानाला लांब धावपट्टीची गरज लागते. हवेचा विरोध करणारे 'ड्रॅग' हे बळ इंजिनच्या थ्रस्टने तोडले जाते. वैमानिक पंखावरील 'फ्लॅप्स' नावाचे भाग खाली करून पंखांचा आकार तात्पुरता बदलतो, त्यामुळे कमी वेगातही जास्त लिफ्ट मिळते आणि विमान सहज वर उडते किंवा खाली उतरते.

थोडक्यात, विमान जादूने नाही तर पंखांचा खास आकार, प्रचंड वेग आणि हवेच्या दाबातील फरक या तीन गोष्टींमुळे हवेत तरंगते. वजन जास्त असले तरी विज्ञानाच्या नियमांनी त्यावर मात करता येते हेच विमान आपल्याला शिकवते.

### दिसण्यावर जाऊ नये

ही गोष्ट मोर आणि लांडोरीची.कथा एका हिरव्यागार रानात एक देखणा मोर राहत होता. त्याचा पिसारा निळा-हिरवा, डोळे लावणारा. सूर्याच्या किरणांत तो पिसारा उघडून नाचला की सगळे प्राणी थक्क होऊन बघत. मोराला त्याच्या सौंदर्याचा खूप गर्व होता. त्याच रानात एक साधी लांडोरही राहत होती. तिचा रंग मातकट, दिसायला अगदी सामान्य. सगळे प्राणी मोराचं कौतुक करायचे, पण लांडोरीकडे कोणी ढुंकूनही बघत नसे.


एकदा रानात शिकारी आले. त्यांना मोराच्या पिसाऱ्याची बातमी लागली होती. त्यांनी जाळी टाकली. मोर आपल्या मोठ्या पिसाऱ्यामुळे झाडीत लवकर लपू शकला नाही. त्याचा नाच सगळ्यांना दिसायचा, पण संकटात तो वेगाने पळूही शकत नव्हता. शिकारी त्याच्या मागे लागले. हे पाहून लांडोर धावली. तिचा रंग मातीशी मिळताजुळता होता. ती झटकन उडाली, इकडे तिकडे पळाली आणि मुद्दाम शिकाऱ्यांचे लक्ष स्वतःकडे वेधून घेतले. शिकारी तिच्या मागे लागले. लांडोर चपळ होती. ती काट्या-कुट्यातून, बिळातून अशी पळाली की शिकारी थकून गेले आणि निघून गेले.

मोराचा जीव वाचला. शिकारी गेल्यावर मोर खाली मान घालून लांडोरीपाशी आला. तो म्हणाला, ताई, मी तुझ्या रूपाला हसलो, पण आज तुझ्या चपळाईने आणि शहाणपणाने माझा जीव वाचवला. माझा पिसारा फक्त दाखवण्यासाठी आहे, पण तुझे गुण खरे उपयोगी आहेत.

लांडोर हसून म्हणाली, दादा, निसर्गाने प्रत्येकाला काही ना काही खास दिलंय. तुझं सौंदर्य रानाची शोभा वाढवतं, आणि माझा साधेपणा माझं संरक्षण करतो. मोठेपणा रूपात नसतो, कर्तृत्वात असतो. तेव्हापासून मोराने गर्व करणे सोडले. तो लांडोरीला मान देऊ लागला.

बोध : रूपापेक्षा गुण महत्त्वाचे: फक्त दिसणे चांगले असून उपयोग नाही, अंगी गुण आणि कर्तृत्व हवे.

## आत्मशक्ति



### घटनांचे पृथक्करण

आम्हाला स्पष्ट समजते, कळते की एक दिवस आम्ही निश्चित स्वरूपात पूर्ण शांती, प्रेम आणि आनंद मिळवू! अभ्यास आजकाल आपल्या आयुष्यांत घडत असलेल्या गोष्टींची यादी करा! सुखदुःखाच्या गोष्टींबाबत विचार करा! ज्या घटनांनी आपणांस काळजीत टाकले आहे वा आनंद दिला आहे, अशा घटनांबाबत विचार करा की, ह्या गोष्टी माझ्या बाबतीतच का घडतात ? त्यानंतर खालीलप्रमाणे अभ्यास करा !

ध्यानधारणेसाठी बसा! त्यावेळी काळजी घ्या की, तेंव्हा वातावरण शांत असावे, आपण अगदी आरामात बसलेलो आहोत, मानसिक तणावातून मोकळे आहोत. असे समजा की आपला आत्मा अंतरीय ज्ञानाशी पूर्णतः जोडला गेला आहे!

लक्षांत घ्या की आता आपण सर्व काही जाणतो, अगदी ज्ञानसागरच आहोत! ह्या जगांत जे काही घडत आहे, ते सारे, जसे समुद्रापासून नदी वाहत असते, अंतर्मनात प्रवाहित होते आहे ! आता आपल्या अंतरीच्या दृष्टीकोनातून बाह्य जगातील घटनांचे पृथक्करण करा!

आपण ज्या घटनांची यादी केली आहे, त्यांचे नीट निरीक्षण करा ! जसे आपण सिनेचित्र फिरतांना पाहतो, तशा ह्या घटना आता आपल्या जागृत आपल्या जागृत आत्मदृष्टीतून पहा! अशी कल्पना करा की, तो परमपिता परमेश्वर आणि त्यांचा पुत्र आत्मा, आपल्या जीवनाबद्दल सविस्तर विचार विनिमय करीत आहेत! जीवनाकडे पहाण्याचा ह्यापेक्षा अधिक परिणामकारक दृष्टीकोन असेल काय आपल्या अंतर्मनाकडून आलेली उत्तरे ऐका!

जेव्हा आपण ध्यानाभ्यासाद्वारे अंतर्मुख होण्याची विद्या जाणून घ्याल तेव्हा आपणांस खऱ्या ज्ञानाचा अनुभव होईल! आतापर्यंत आमच्या चंचल, अस्थिर मनाने, जगभरच्या बातम्यांतून वेगवेगळ्या अफवांतून किंवा दुनियाभरच्या घटनांतून आम्हांला अंतर्मुख होऊ दिले नाही. तेव्हा अंतर्मुख होण्यासाठी आम्ही काही वेळ काढला पाहिजे. आमचे मन शांत ठेवले पाहिजे, आमच्या मनातील वादविवाद, त्याबाबतचे त्याचे पृथक्करण आणि आमच्या आत्म ज्ञानामधील फरक आम्ही समजून घेतला पाहिजे.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### माझे विचार

सुरेश ओबेरॉय : हे शक्य नाही.

शिवानीदीदी : आपण आपलं ऊर्जाक्षेत्र बदलवू शकत नाही का? आपण जी कर्म करणार आहोत त्यांची ताकद वाढवू शकत नाही का?

सुरेश ओबेरॉय : याचा अर्थ, मी माझ्याशी खोटं बोलायचं ?

शिवानीदीदी : तुम्ही खोटं नाही बोलत आहात. तुम्ही असा विचार करायला हवा की ज्यांचं लग्न आहे त्यांना तुम्ही आशीर्वाद द्यायला जात आहात. तुम्ही यजमान कुटुंबाचा भाग बनायला चालला आहात. यात काही खोटं नाही आहे. अशा प्रकारे तुमचं ऊर्जाक्षेत्र शुद्ध होईल आणि तुमची स्पंदनं स्पष्ट होतील. आपण सगळ्यांनीच आपल्या विचारांची मर्यादा वाढवून, जुन्या पद्धती मोडायला हव्यात.

सुरेश ओबेरॉय : आपण आपल्याला एखाद्या डबक्यापुरतंच मर्यादित केलंय हे मला मान्य आहे. आता आपण समुद्रासारखं बनायचा प्रयत्न करायला हवा. शिवानीदीदी : आपल्या शक्यता अमर्यादित आहेत आणि आपल्याला हवे तितके आपले विचार उन्नत, प्रगत होऊ शकतात.

सुरेश ओबेरॉय : मला माझ्या विचारांची मर्यादा वाढवून दिलदारपणे वागलं पाहिजे.

शिवानीदीदी : आपण इतरांची नक्कल न करता आपल्या मूळ गुणांनुसार वागतो तेव्हा आपली क्षुद्रता मागे पडते. ते आले नाहीत, मीही जाणार नाही, हा खूपच सामान्य विचार आहे. अशा सामान्य विचारांतून बाहेर पडा. सुरेश ओबेरॉय : जेव्हा मी सामान्यापेक्षा मोठा विचार करतो तेव्हा माझा अहंकार वाढतो.

शिवानीदीदी : नाही. उलट तुमचा अहंकार कमी होईल. वर उल्लेखिलेले सामान्य विचार या वेळी असे असतील – 'मी एक रजोगुणी आत्मा आहे आणि मी कार्यक्रमाला माझ्या मर्यादिसह जाईन.... मी सगळ्यांना प्रेम देईन आणि त्या ठिकाणी जाण्याआधी भूतकाळाला इथेच सोडून जाईन.' भूतकाळातल्या जखमा आठवत त्यांनाही त्या ठिकाणी घेऊन गेलात तर त्या तुमच्याकडून प्रसारित होतील आणि त्यांनाही ते जाणवेल.

सुरेश ओबेरॉय : मी ही स्पंदनं बरोबर घेऊन जाईन.

शिवानीदीदी :

हो, आणि हेच आपल्याला जाणवत नाही. आपल्याला असं वाटतं की आपण लोकांशी छान वागलो, बोललो की लोकांना आपल्या मनात काय चालू आहे ते कळणार नाही.

सुरेश ओबेरॉय : आता मला हे कळलंय.

शिवानीदीदी: चला भूतकाळ विसरून या आणि लक्षात ठेवू या की, मी तिथे जात आहे कारण त्यांनी मला प्रेमाने बोलावलं आहे आणि मला मान दिला आहे.

सुरेश ओबेरॉय हो, त्यांनी असंच केलंय.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

ग्राहक : वेटर, जेवण कधी येणार? अर्धा तास झाला.
वेटर : साहेब, आमच्या हॉटेलचं नावच 'सब्र का फल' आहे.
मालक : आणि सब्र संपला की 'सब्र का बिल' पण गोड लागतं.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✲ 'काळा' या विशेषणाचे विरुद्धलिंगी रूप काय?

– काळी

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

### पालक भाजी

उत्कृष्ट स्तन्यनिर्मिती होऊन बालकाचे वजन वाढीस लागते. अ जीवनसत्त्वाने परिपूर्ण अशी पालक भाजी खाल्ल्याने डोळ्यांच्या तक्रारी कमी होतात. तसेच रातआंधळेपणा या विकारावर पालक हे एक उत्तम परिपूर्ण औषध आहे. पालकाची भाजी जीवनशक्तीचे मूलस्त्रोत आहे. त्यामुळे एखाद्या स्तनपान देणाऱ्या मातेला पुरेसे दूध येत नसेल, तर अशा वेळी बालकाची वाढ करण्यासाठी बाळ चार महिन्यांचे झाल्यानंतर पालकाच्या पानांचे सूप करून बाळाला पाजावे. यामुळे बाळाची वाढ चांगली होते.

पालकाच्या सेवनाने रक्तदाब नियंत्रणात राहतो. अंगावर गाठ येऊन जर सूज आली असेल, तर अशा वेळी पालकाच्या पानांचे पोटीस गरम करून त्या जागी बांधावे.

पालकामध्ये रक्तशोधक गुणधर्म असल्यामुळे यकृताचे विकार, कावीळ, पित्तविकार यामध्ये ते उपयुक्त आहे. १०) आतड्यांची ताकद वाढविण्यासाठी व त्यांना क्रियाशील बनविण्यासाठी पालकाचा एक ग्लासभर रस अनुशापोटी नियमितपणे सेवन करावा. याच्या सेवनाने आतड्यातील मलाचे निस्सारण होण्यास मदत होते व शौचास साफ होऊन पोट स्वच्छ राहते. ११) मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार, संधिवात हे सर्व आजार आटोक्यात ठेवण्यासाठी पालकाच्या भाजीचा आहारात नियमितपणे वापर करावा. १२) शहाळ्याच्या पाण्यातून ताजा पालक रस दिवसातून दोन वेळा एक-एक कप घेतल्यास मूत्रप्रमाण वाढून मूत्रातील आम्लता कमी होते व त्यामुळे लघवीला जळजळ, थेंब-थेंब लघवी होणे अशी लक्षणे नाहीशी होतात.

सावधानता : +अति पाणी घालून पालकाची भाजी शिजवू नये, तसेच भाजी शिजल्यानंतर ते पाणी फेकून देऊ नये. यामुळे त्यामध्ये असणारे पोषक घटक वाया जाणार नाहीत. पालकाची भाजी स्वच्छ धुऊन पानांमध्ये जेवढे पाणी शिल्लक राहील तेवढेच पाणी भाजी शिजवताना वापरावे. पावसाळ्यामध्ये पालकाच्या भाजीवर कीड पडते, तसेच पालक हा वात प्रकोपक असल्याने सहसा पावसाळ्यात पालकाची भाजी खाऊ नये किंवा भाजी खायचीच असेल तर ती प्रथमतः स्वच्छ दोन-तीन पाण्याने धुऊन काढावी.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# रात्रीच्या वेळी संशयास्पद हालचालींमुळे नागरिक भयभीत; वाढत्या घरफोडी आणि गुन्हेगारीमुळे पोलीस गस्त वाढवावी


## नगरसेवक महेश लोंढे यांच्यासह नागरिकांच्या शिष्टमंडळाचे विभागीय पोलीस अधिकारी यांना निवेदन



पोलीस प्रशासनाने गस्त वाढवावी, अशा मागणीसाठी नगरसेवक महेश लोंढे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने शहराचे विभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांची भेट घेऊन या मागणीचे निवेदन सादर दिले.

नगर – अहिल्यानगर शहरातील घरफोडी, चोरी आणि इतर गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः गणेशनगर, माधवनगर, भावना–ऋषी सोसायटी आणि साईराम सोसायटी परिसरातील रहिवाशांनी सुरक्षेबाबत चिंता व्यक्त करत पोलीस प्रशासनाने या भागात गस्त वाढवावी, अशी मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक महेश लोंढे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने शहराचे विभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांची भेट घेऊन या मागणीचे निवेदन सादर दिले. यावेळी परिसरातील नागरिक उपस्थित होते. वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना आणि परिसरातील कायदा व सुव्यवस्थेबाबतच्या समस्या याकडे शिष्टमंडळाने अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, कल्याण रोड भागातील गणेशनगर, माधवनगर, भावना–ऋषी सोसायटी आणि साईराम सोसायटी परिसरात मागील काही काळात घरफोडी, चोरी तसेच इतर गुन्हेगारी प्रकारांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे नागरिकांच्या मनात भीती निर्माण झाली असून विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.



सीसीटिव्ही कॅमेऱ्यात कैद झालेले चोर.

नागरिकांनी सांगितले की, रात्रीच्या वेळी या भागात संशयास्पद व्यक्तींची वर्दळ वाढल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी अपरिचित व्यक्तींच्या हालचालींबाबत नागरिकांनी चिंता व्यक्त केली असून त्यामुळे रहिवाशांना सतत असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. या परिस्थितीमुळे नागरिकांनी पोलीस प्रशासनाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. शिष्टमंडळाने निवेदनात १६ फेब्रुवारी २०२६ रोजी शिवाजीनगर परिसरातील कवडे मळा येथे घडलेल्या खुनाच्या घटनेचाही उल्लेख केला. अशा गंभीर घटनांमुळे नागरिकांमध्ये आणखी भीती निर्माण झाली असून संबंधित प्रकरणात कठोर आणि प्रभावी कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

परिसरातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी नियमित पोलीस पेट्रोलिंग वाढविणे, रात्रीच्या वेळी विशेष गस्त पथके तैनात करणे, संशयास्पद हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवणे तसेच आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे गरजेचे आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून नियमित गस्त वाढवावी, अशी मागणी निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

## वासनेपासून सद्‌गुण दूरच

संकलन: दिशान फिचर्स




एका संस्कृत कवीचे अनुभवाचे बोल आहेत. सोन्याची सुरी म्हणून का कुणी आपल्या उरात मारी ? स्वतः च्या हिताचीच जो तो जपणूक करतो. अहो, शत्रुलाही मित्र म्हणावे, जर का त्याने आपले कल्याण केले तर. उलट भाऊ म्हणायचा आणि आपले उणे पाहायचा, तर तो शत्रू ठरायचा.

खरे तर ना शत्रू, ना भाऊ म्हणतील. आम्ही तुझं हित पाहू. कारण शत्रू शब्दाचा अर्थच आहे घातकी आणि भावाची तर प्रसिद्धच आहे भाऊबंदकी म्हणून जो आपल्याला भावेल, तो आपला भाऊ ठरेल. रोग आपल्याच शरीरात निर्माण झाला, म्हणून काय त्याला ओंजारून गोंजारून वाढवायचा ? त्याच्यावर करायचे जंगली जडीबुटीचे प्रयोग. ती घालवेल तो रोग. मग जडीबुटीच ठरेल आपली हितकर्ती.

धनाचा लोभी कधी तरी दयाळू होईल? कुणाला कवडी तरी काढून देईल? प्रेताच्या टाळूवरचेही लोणी खाईल. वाघाने कधी हरणावर दया केली आहे? विस्तवाशी खेळ, हा आनंदाचा मेळ कधी झाला आहे? विस्तव म्हणजे चकटे.

सौंदर्य आणि सद्गुण, क्वचितच येतो असा योग जुळून. परस्परविरोधी किंवा परस्परोपकारी वस्तू गुण्यागोविंदाने नांदणे, हे क्वचितच घडणे. जर तसे घडले व व्यक्तीचे वाईट गुण गेले आणि चांगले तेवढे बाणले, तर जगाचे नष्टचर्यच संपले.

संत नामदेव म्हणतात, असा सर्वगुणसंपन्न माणूस कसा मिळणार? जर का मिळाला ना, तर दुःखदैन्य आणि तापसंताप तडकाफडकी दूर होईल. माणूस मुक्त होईल त्रासातून, तणावातून आणि भोगेल केवळ आनंद.

आपला अनुभव मात्र संत नामदेवांप्रमाणेच सांगतो, की दुर्गुणाच्या आश्रयाने सद्‌गुणाला जगणे जडच जाते. त्यातही हा दुर्गुण लालसा, उपभोगाची तीव्र वासना यातून निर्माण झाला असेल, तर सद्‌गुण त्याच्या वाऱ्यालाही उभा राहू शकणार नाही.

भिकारी हा पैशाचा शिकारी. प्रामाणिकपणा कसा राहील त्याच्या पदरी ? भिकारी आणि आपले बोलणे खरे करी, असे घडले का कधीतरी ? एकदा एक भिकारी एका धान्याच्या दुकानी गेला. कालपासून उपाशी आहे. म्हणाला. धान्य उधार देण्याची विनंती करू लागला. दुकानदार म्हणाला, 'अरे, काय भरवसा? हे धान्य ते विकूनही टाकशील.' भिकारी म्हणाला, असं कशाला करेन बरे मी. दुकानदार म्हणाला, गावात सर्कस आलीय. नवे नवे तुझा खेळ, नवे नवे प्राणी. म्हटलं हे धान्य विकून तूही काढशील तिकिटं सर्कसची. भिकारी म्हणाला, 'छे, छे। मी असं फसवणार नाही तुम्हाला. कारण सर्कसच्या तिकिटापुरते पैसे वेगळे काढून ठेवलेत मी.'

अर्थ व्यर्थ घालवून स्वत:वर अनर्थ घेणे नाही का हे?

– किशोर गांधी

# 'राज्यमाता गोमाता संवाद यात्रेचे' २३ जूनला अहिल्यानगरला आगमन

नगर – महाराष्ट्र गोसेवा आयोग व पशुसंवर्धन विभागातर्फे २२ जूनपासून राज्यभर राज्यमाता गोमाता संवाद यात्रेचा शुभारंभ करण्यात आला आहे. ही यात्रा १५ सिवसांत ६००० किमीचा प्रवास करणार असून २३ जून रोजी सकाळी १० वाजता मनमाड रोड येथील संजोग मंगल कार्यालय येथे ही यात्रा पोहोचणार आहे.

या संवादयात्रेला जिल्ह्यातील सर्व गोशाळा संचालक, गोपालक, शेतकरी, गोसेवक व गोप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन गौतम कराळे यांनी केले आहे.

पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र गोसेवा आयोग यांच्यावतीने आयोजित राज्यमाता गोमाता संवाद यात्रेत ३५ जिल्ह्यातील १००० गोशाळांचा सहभाग आहे. या संवाद यात्रेच्या अध्यक्षस्थानी मुंबई येथील वर्धमान संस्कार धामचे राजुभाई शाह तर विशेष अतिथी म्हणून गोसेवा आयोग (राज्यमंत्री दर्जा) अध्यक्ष शेखर मुंदडा यांची उपस्थिती असणार आहे. तसेच कार्यक्रमास आ. संग्रामभैया जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, जिल्हाधिकारी पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, उपमहापौर धनंजय जाधव, उपायुक्त पशुसंवर्धन उमेश पाटील, नाशिक विश्व हिंदू परिषदेचे विभाग प्रमुख गजेन्द्र सोनवणे, हिंदूराष्ट्र सेनेचे जिल्हाध्यक्ष संजय अडोळे आदी उपस्थित राहणार आहेत.

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, गोशाळा महासंघ, शेखर मुंदडा मित्र परिवार यांनी या कार्यक्रमाचे आयोजन व संयोजन केले आहे.





सारडा महाविद्यालयात योगासने, एरोबिक्स, प्राणायाम व ध्यानधारणेने योगदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# सारडा महाविद्यालयात योगासने, एरोबिक्स, प्राणायाम व ध्यानधारणेने योगदिन उत्साहात

नगर – पेमराज सारडा महाविद्यालयात १९ जून रोजी सकाळी जागतिक योग दिन उत्साहात साजरा झाला. महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांना प्रशिक्षित योग साधकांनी योगाभ्यासाचे धडे दिले. यावेळी सर्वांनी विविध योगासने करत प्राणायाम व ध्यानधारणाही केली. तसेच संगीताच्या तालावर एरोबिक्स, शाळा पिटी करून उत्साहात योगदिन साजरा केला.

महाविद्यालयाचे चेअरमन व संस्थेचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी यांच्या हस्ते व उपकार्याध्यक्षा प्रा.ज्योती कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत योग दिनाचे उद्घाटन झाले. योग दिन २१ जून रोजी सारडा महाविद्यालयात नीट परिक्षा असल्याने गुरुवारी योग दिन साजरा करण्यात आला, अशी माहिती प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी दिली.

कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी म्हणाले, योगासनांचा जनकच आपला भारत असून योग ही आपली वैभवशाली संस्कृती व परंपरा आहे. याचे जतन करण्यासाठी हा योगदिन साजरा होत आहे. दैनंदिन योगाभ्यासाने आपण विना पैशाने मोफत सुदृढ आरोग्य प्राप्त करत असल्याने सर्वांनी नित्याने योगाभ्यास करावा. सारडा महाविद्यालय योद दिनाची परंपरा प्रत्येक वर्षी जपत आहे.

प्रा.ज्योती कुलकर्णी म्हणाल्या, हेल्थ इज वेल्थ. तुम्ही आयुष्यात कितीही पैसा कमावला पण तुमचे आरोग्य निरोगी नसेल तर सर्व काही व्यर्थ आहे. त्यामुळे सर्वांनी निरोगी व आनंदी जीवन जगण्यासाठी रोज थोडा वेळ काढून योगाभ्यास करा, असे आवाहन त्यांनी केले. महाविद्यालयाच्या प्रांगणात सर्वांना सकाळीच्या प्रफुल्लित वातावरणात महाविद्यालयाचे योग विभाग प्रमुख प्रा.राजू रिक्कल योगाचे प्रत्याक्षिके घेतली तर व क्रीडा प्रशिक्षक संतोष खैरनार यांनी संगीताच्या तालावर एरोबिक्सचे धडे दिले. यावेळी उपप्राचार्य प्रा.मिलिंद देशपांडे व प्रा.गिरीश पाखरे, पार्यावेक्षक प्रा.सुजित कुमावत आदी उपस्थित होते.

# सैनिकांच्या कुटुंबांशी थेट संपर्कासाठी 'मिशन निरंतर मिलाप १.०'चा चौथा टप्पा सुरू



सैनिकांच्या कुटुंबांशी थेट संपर्कासाठी 'मिशन निरंतर मिलाप १.०'चा चौथा टप्प्याला प्रारंभ झाला.

नगर – माजी सैनिक, वीरनारी तसेच शहीद जवानांच्या कुटुंबीयांच्या विविध समस्या आणि तक्रारींचे त्वरित निराकरण करण्याच्या उद्देशाने मेकॅनाइज्ड इन्फंट्री सेंटर अँड स्कूल, अहिल्यानगर यांच्या वतीने 'मिशन निरंतर मिलाप १.० – सेंट्रल ईस्ट झोन' या उपक्रमाच्या चौथ्या टप्प्याला प्रारंभ करण्यात आला. या मोहिमेच्या पथकाला १७ जून रोजी मेजर जनरल आर. प्रेम राज, अतिरिक्त महासंचालक मेकॅनाइज्ड इन्फंट्री यांच्या हस्ते हिरवा कंदील दाखवून रवाना करण्यात आले.

लेफ्टनंट जनरल पी. एस. शेखावत, चीफ ऑफ स्टाफ, मुख्यालय दक्षिण–पश्चिम कमांड व कर्नल ऑफ द रेजिमेंट यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. माजी सैनिक, वीरनारी आणि त्यांच्या कुटुंबीयांशी थेट संपर्क साधून त्यांच्या दारापर्यंत पोहोचत विविध प्रश्नांचे निराकरण करणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे.

यावेळी मेकॅनाइज्ड इन्फंट्री सेंटर ॲण्ड स्कूलचे मुख्य रेकॉर्ड अधिकारी लेफ्टनंट कर्नल अशोक कुमार यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, कनिष्ठ आयुक्त अधिकारी आणि अन्य अधिकारी उपस्थित होते.

मोहिमेच्या चौथ्या टप्प्यात दोन कनिष्ठ आयुक्त अधिकारी, चार बिगर आयुक्त अधिकारी तसेच मेकॅनाइज्ड इन्फंट्री रेजिमेंट आणि विविध बटालियनचे प्रतिनिधी सहभागी आहेत. हे पथक ओडिशा, पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड आणि छत्तीसगड या राज्यांतील १६ जिल्ह्यांचा दौरा करून सुमारे ४,१२५ माजी सैनिक, वीरनारी आणि शहीद जवानांच्या कुटुंबीयांशी प्रत्यक्ष संवाद साधणार आहे.

दौऱ्यादरम्यान पेन्शनविषयक लाभ, SPARSH प्रणालीशी संबंधित अडचणी, विविध कल्याणकारी योजना तसेच इतर सेवाविषयक प्रश्नांबाबत मार्गदर्शन आणि तात्काळ मदत उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यामुळे लाभार्थ्यांच्या तक्रारींचे जलद निराकरण होण्यास मदत होणार आहे.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, या उपक्रमामुळे रेजिमेंट आणि माजी सैनिकांच्या कुटुंबीयांमधील भावनिक नाते अधिक दृढ होईल. तसेच सन्मान, आपुलकी आणि वेळेवर मदतीची भावना अधिक बळकट होईल.

'मिशन निरंतर मिलाप' हा केवळ प्रशासकीय उपक्रम नसून राष्ट्रसेवेसाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांप्रती कृतज्ञता, संवेदनशीलता आणि बांधिलकी व्यक्त करणारा मानवी दृष्टिकोन आहे. देशसेवकांच्या कुटुंबीयांसोबत रेजिमेंट कायम खंबीरपणे उभी आहे, हा संदेश या मोहिमेतून दिला जात आहे.




शिवसेनेच्या ६० व्या वर्धापनदिनानिमित्त प्रभाग क्रमांक ९ मधील नागरिकांसाठी नगरसेविका रूपाली संदीप दातरंगे यांच्या पुढाकारातून एसटी स्मार्ट कार्ड (एनसीएमसी) नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

# शिवसेनेच्या वर्धापनदिनानिमित्त एनसीएमसी स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिरास प्रतिसाद

नगर – शिवसेनेच्या ६० व्या वर्धापनदिनानिमित्त प्रभाग क्रमांक ९ मधील नागरिकांसाठी नगरसेविका रूपाली संदीप दातरंगे यांच्या पुढाकारातून एसटी स्मार्ट कार्ड (एनसीएमसी) नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. नेप्ती नाका येथील मार्कंडेय मंगलकार्यालयात आयोजित या शिबिराचे उद्घाटन शहरप्रमुख संभाजी कदम यांच्या हस्ते करण्यात आले.

या उपक्रमाला परिसरातील नागरिक, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी प्रतिसाद दिला. यावेळी नगरसेवक संजय शेंडगे, दत्तात्रेय कावरे, श्याम नळकांडे, सचिन शिंदे, विक्रम राठोड, श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठानचे अध्यक्ष संदीप दातरंगे, शुभम दातरंगे यांच्यासह सुनील दातरंगे, विशाल दातरंगे, अनंत दातरंगे, बाळासाहेब ठाणगे, नारायण एकलदेवी, बबन लबडे, गोवर्धन राऊत, शिवा चौघुले, संतोष दोनता, योगेश बोडके आदी उपस्थित होते.

# एसूस कंपनीचे उपाध्यक्ष अर्नाल्ड सु २४ जून रोजी अहिल्यानगरमध्ये




नगर– जागतिक कीर्तीची तंत्रज्ञान कंपनी एसूसचे उपाध्यक्ष अर्नाल्ड सु हे तब्बल १४ वर्षांनंतर २४ जून रोजी अहिल्यानगर दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या आगमनामुळे जिल्ह्यातील संगणक, आयटी आणि तंत्रज्ञान क्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

२४ जून रोजी सकाळी ११ वाजता अर्नाल्ड सु हे वाडिया पार्क येथील एसूसचे अधिकृत श्री कॉम्प्युटर स्टोअरला भेट देणार आहेत. या भेटीदरम्यान ते श्री कॉम्प्युटरचे संचालक विशाल जगताप यांच्यासह जिल्ह्यातील विक्रेते, होलसेलर, व्यावसायिक आणि ग्राहकांशी थेट संवाद साधणार आहेत. अर्नाल्ड सु यांच्या नेतृत्वाखाली एसूस इंडियाने भारतीय बाजारपेठेत उल्लेखनीय प्रगती साधली आहे. कंपनीचा बाजारातील हिस्सा ४ टक्क्यांवरून २२ ते २३ टक्क्यांहून अधिक वाढविण्यात त्यांचे मोठे योगदान राहिले आहे. नो मॅजिक, ओन्ली बेसिक या कार्यतत्त्वावर त्यांनी काम करत एसूसचे रिटेल नेटवर्क केवळ महानगरांपुरते मर्यादित न ठेवता निमशहरी व ग्रामीण भागातही प्रभावीपणे विस्तारले आहे. भारतामध्ये डिजिटल क्रांती वेगाने होत असताना मेक इन इंडिया आणि स्टार्टअप इंडियासारख्या उपक्रमांना पूरक ठरणारे अनेकतंत्रज्ञानविषयकउपक्रम एसूसने राबविले आहेत. अर्नाल्ड सु यांचा अनुभव आणि मार्गदर्शन स्थानिक आयटी उद्योजक, विक्रेते आणि नवउद्योजकांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचे मानले जात आहे. या विशेष दौऱ्यानिमित्त श्री कॉम्प्युटर येथे अर्नाल्ड सु यांचे पारंपरिक महाराष्ट्रीयन पद्धतीने स्वागत करण्यात येणार आहे. कार्यक्रमास जिल्ह्यातील संगणक विक्रेते, आयटी क्षेत्रातील व्यावसायिक, तंत्रज्ञानप्रेमी आणि ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १० वाजता होणार असून या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाला कॉम्प्युटर व आयटी क्षेत्रातील मान्यवर, विक्रेते आणि ग्राहकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन श्री कॉम्प्युटरचे संचालक विशाल जगताप यांनी केले आहे.

अर्नाल्ड सु यांच्या अहिल्यानगर भेटीमुळे जिल्ह्याच्या आयटी क्षेत्राला नवी ऊर्जा मिळणार असून तंत्रज्ञान क्षेत्रातील नव्या संधींचे दरवाजे खुलण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# 'जय आनंद महावीर'च्या शाकाहारी टिफीन स्पर्धेत प्राची थिगळे प्रथम



जय आनंद महावीर युवक मंडळाच्या शाकाहारी टिफीन स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांच्या समवेत मंडळाचे पदाधिकारी.

नगर – प्रत्येक महिलेमध्ये पाककलेचे गुण असतात. कुटुंबातील प्रत्येक सदस्याला सकस, ताजे आणि पौष्टिक अन्न देण्यासाठी त्या स्वयंपाक घरात अतिशय आपुलकीने स्वयंपाक करतात. सध्याच्या जंक फूडच्या काळात मुलांना शुद्ध शाकाहारी पौष्टिक टिफीन देताना महिला कल्पकता दाखवतात. त्यामुळे मुलं घरचा टिफीन आनंदाने खातात. सुगरण महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी जय आनंद महावीर युवक मंडळाने आयोजित केलेल्या स्पर्धेला मोठा प्रतिसाद मिळाला. महिलांना चांगल्या रेसिपींची माहिती झाली. अशा स्पर्धांतून महिलांना प्रोत्साहन मिळण्यास मदत होते, असे प्रतिपादन सिमा राहुल मुनोत यांनी केले.

नवी पेठ येथील जय आनंद महावीर युवक मंडळाच्या वतीने महिलांसाठी पौष्टिक शाकाहारी टिफीन स्पर्धा नुकतीच ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली. या स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राची अमोल थिगळे (ज्वारीचे पौष्टिक धिरडे) यांना मिळाला. द्वितीय क्रमांक उषा नितीन शेठिया (मोरींगा स्क्वेअर्स), तृतीय क्रमांक शिल्पा पियुष मुथ्था (कडधान्याचे स्प्राऊड अप्पे) तर उत्तेजनार्थ पारितोषिक शैला सुरेश सोनसळे (बाजरीच्या पुऱ्या), वर्षा विशाल गुंदेचा (नाचणी व ज्वारीचं नूडल्स), सोनल तरटे (नाचणीचे लाडू), कोमल पवार (ज्वारीचे घावण) यांना मिळाले. सर्व विजेत्यांना रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी सिमा मुनोत, स्पर्धेच्या परीक्षक राणी शरद मुथा, मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत, सेक्रेटरी आनंद मुथा, कार्याध्यक्ष सत्येन मुथा, प्रमोद गांधी (पीटू) आदी उपस्थित होते.

शैलेश मुनोत म्हणाले की, नगरच्या सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असलेले जय आनंद महावीर युवक मंडळ यंदा रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. यंदाचा गणेशोत्सव आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करण्याचे नियोजन आहे. वर्षभर दर महिन्याला विविध स्पर्धा घेण्यात येणार आहेत. महिलांसाठी मंडळ कायम विविध उपक्रम राबवित असते. शाकाहारी पौष्टिक टिफीन बनवा स्पर्धेतून महिलांच्या पाक कौशल्याला व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले.

ऑनलाईन माध्यमातून स्पर्धा घेतल्याने अधिक महिलांना सहभागी होता आले. स्पर्धेच्या ठिकाणी येण्याजाण्याचा त्यांचा वेळ वाचला. सर्वच स्पर्धकांनी अतिशय उत्तम रेसिपी सादर केल्या. महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी मंडळ यापुढेही वेगवेगळे उपक्रम निश्चितच राबवेल. मंडळाचे कार्य वर्षभर चालू असते. आरोग्य तपासणी शिबिरे, रक्तदान शिबीर,नेत्र तपासणी शिबिर, शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा, विविध सामाजिक विषयावर खुल्या निबंध स्पर्धा, आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अन्नदान, वारकरी सेवा, वंचित मुलांच्या संस्थांना किराणा, क्रीडा साहित्याची भेट, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा सन्मान, माहितीपर दिनदर्शिका प्रकाशन व मोफत वितरण, शिक्षक दिनी गुरूजणांचा सन्मान, स्वच्छता अभियान, मतदार जागृती, पर्यावरण संवर्धन, महावीर जयंतीला अहिंसा, शांततेचा संदेश असे विविध उपक्रम राबविण्यात येतात. मंडळाचे सर्व सभासद उत्साहात सर्व उपक्रमात सहभागी होतात. यंदा रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने सर्वच सभासदांचा उत्साह आणखी वाढला आहे. विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून हे वर्ष संस्मरणीय करण्याचा प्रयत्न आहे.

स्पर्धेतील विजेत्या प्राची थिगळे, उषा शेठिया, शिल्पा मुथा यांनी मंडळाच्या या उपक्रमाचे कौतुक केले. प्रत्येक घरात महिलेसमोर दररोज सकस आणि पौष्टिक टिफीन मुलांना देण्याचे आव्हान असते. अशा स्पर्धांमुळे महिलांना आपलं पाक कौशल्य, कल्पकता दाखवण्याची संधी मिळते तसेच इतरांच्याही चांगल्या रेसिपी समजतात. त्यामुळे वेळोवेळी अशा स्पर्धा झाल्या पाहिजेत अशा भावना विजेत्या महिलांनी व्यक्त केल्या. कार्यक्रमाच्या शेवटी आनंद मुथा यांनी आभार मानले.

# रामायण कधीच जुने होत नाही; चार वेद आणि सनातन संस्कृती हिच भारताच्या वैभवाचा पाया

### स्वामी अद्वैतानंद सरस्वती

नगर – श्रीराम हे केवळ एका युगाचे नायक नसून संपूर्ण मानवजातीसाठी आदर्श जीवनमूल्यांचे प्रतीक आहेत. रामायण ही केवळ कथा नसून ती भारतीय संस्कृतीचे जीवन, तत्त्वज्ञान आहे. रामकथा कधीही जुनी होत नाही, कारण प्रत्येक पिढीला ती नवे संस्कार, नवी प्रेरणा आणि जीवन जगण्याची दिशा देत असते. चार वेद, उपनिषदे आणि सनातन संस्कृतीचा अमूल्य वारसा आपल्या समाजाला आजही टिकवून ठेवत आहे, असे प्रतिपादन स्वामी अद्वैतानंद सरस्वती यांनी केले.


चिन्मय मिशनच्या वतीने आयोजित तुळशी रामायणावर आधारित सुंदरकांड ज्ञानयज्ञाचे उद्घाटन दीपप्रज्वलन करुन करताना स्वामी अद्वैतानंद सरस्वती, स्वामी प्रत्ययानंद सरस्वती, महापौर ज्योतीताई गाडे, ॲड. डी. डी. घोरपडे, विद्याताई हारदे, उत्तमराव साळुंखे आदी.

चिन्मय मिशनच्या वतीने आयोजित तुळशी रामायणावर आधारित सुंदरकांड ज्ञानयज्ञाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. या ज्ञानयज्ञाचा शुभारंभ दीपप्रज्वलनाने भक्तिमय वातावरणात झाला. यावेळी स्वामी प्रत्ययानंद सरस्वती, महापौर ज्योतीताई गाडे, चिन्मय मिशनचे अध्यक्ष ॲड. डी. डी. घोरपडे, उपाध्यक्ष विद्याताई हारदे, कोषाध्यक्ष उत्तमराव साळुंखे, सचिव देवराम मोरे उपस्थित होते.

प्रारंभी चिन्मय मिशनचे कोषाध्यक्ष उत्तमराव साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. स्वामी प्रत्ययानंद सरस्वती म्हणाले, अशी कोणतीही जागा नाही जिथे प्रभू श्रीरामांचे अस्तित्व नाही. संपूर्ण जगभरात रामायणाचा प्रभाव आणि महिमा पसरलेला आहे. भारताच्या सीमा ओलांडून अनेक देशांमध्ये रामायणाचा अभ्यास केला जातो. रामकथा ही मानवाला सदाचार, संयम, कर्तव्य आणि आदर्श जीवन जगण्याची प्रेरणा देणारी आहे. त्यामुळेच रामायणाला जागतिक स्तरावर विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

स्वामी अद्वैतानंद सरस्वती म्हणाले, प्रभू श्रीरामांचे व्यक्तिमत्त्व फुलाप्रमाणे सुगंधित आहे. त्यांच्या जीवनातील प्रत्येक प्रसंग मानवाला काही ना काही शिकवण देतो. रामायण ही आपल्या दुःखाचे निवारण करणारी कथा आहे. बुद्धिमान आणि विचारशील व्यक्तींना या ग्रंथात जीवनाचे गूढ आणि तत्त्वज्ञान सापडते. मनातील व्यथा, चिंता आणि अस्थिरता दूर करण्याची ताकद रामकथेमध्ये आहे.

सुंदरकांडाच्या महिम्याविषयी ते म्हणाले, या कांडातील प्रत्येक श्लोक सुंदर आहे. भगवान सुंदर आहे. भक्त सुंदर आहे. भक्ती सुंदर आहे आणि ध्यानही सुंदर आहे. विठ्ठलाच्या विटेवरील भक्तीपासून ते रामभक्त हनुमंतांच्या समर्पणापर्यंत सर्वत्र सौंदर्याचे दर्शन घडते. म्हणूनच भारतीय संस्कृतीने सत्यम्, शिवम्, सुंदरम् ही संकल्पना स्वीकारली आहे. बाह्य सौंदर्य क्षणिक असते. परंतु अंतःकरणातील सौंदर्य आणि संस्कार चिरंतन असतात, असेही त्यांनी नमूद केले.

घोरपडे म्हणाले, चिन्मय मिशनचे कार्य केवळ आध्यात्मिक क्षेत्रापुरते मर्यादित नाही. राष्ट्र उभारणी, समाजसेवा, संस्कार संवर्धन आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठीही मिशन प्रभावीपणे कार्यरत आहे. समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी अशा ज्ञानयज्ञांची आवश्यकता असून त्यासाठी प्रत्येकाने योगदान दिले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

प्रमुख अतिथी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या, भगवद्गीता, रामायण आणि भारतीय संस्कृतीतील महान मूल्ये घराघरांत पोहोचविण्याचे मोलाचे कार्य चिन्मय मिशन करत आहे. धर्म, संस्कार आणि अध्यात्म यांचा प्रसार झाल्यास समाज अधिक सुदृढ आणि सुसंस्कृत होईल. रामायणामधील सुंदरकांड हे श्रीरामांचे परमभक्त हनुमान यांच्यावर आधारित आहे. भविष्यातही चिन्मय मिशनच्या उपक्रमांना आपले संपूर्ण सहकार्य राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. सूत्रसंचालन डॉ. ओंकार पाठक यांनी केले. आभार ॲड. डी. डी. घोरपडे यांनी मानले.


जिल्हा कारागृहात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगासने व प्राणायामचा सराव बंदी बांधवांकडून करुन घेताना डॉ. सुधा कांकरिया. समवेत योगतज्ञ दिलीप मते, कारागृह अधीक्षक संतोष कवार आदी.

# बंद्यांनी गिरवले योग-राजयोगाचे धडे

### जिल्हा कारागृहात आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा

नगर – येथील जिल्हा कारागृहात आंतरराष्ट्रीय योग दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. डॉ. सुधा कांकरिया यांच्या पुढाकाराने संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचे आयोजन रोटरी क्लब ऑफ अहमदनगर-रोटरी पीस अँड हार्मनी सेंटर, ब्रह्मकुमारीज साईबन मे मधुबन, पतंजली संस्था तसेच मानकन्हैया ट्रस्ट यांनी केले होते, अशी माहिती कारागृह अधीक्षक संतोष कवार यांनी दिली.

सदर प्रसंगी राजयोगा जीवनपद्धतीच्या अभ्यासक डॉ. सुधा कांकरिया म्हणाल्या, योग ही भारताने जगाला दिलेली अमुल्य देणगी आहे. योग व राजयोग यामुळे जीवन स्वस्थ, सुंदर व यशस्वी होते. योग राजयोग केवळ एक दिवस नव्हे तर रोजच आपल्या दैनंदिन जीवनात त्याचा अंगीकार केला पाहिजे. योगा प्राणायाममुळे शरीर स्वस्थ व निरोगी होते तर राजयोगा मेडिटेशनमुळे मनाला ताकद मिळते, रोगप्रतिकारशक्ती वाढते, जीवन तणाव मुक्त होऊन ते आनंदी व यशस्वी होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अथक परिश्रमामुळे भारताचा योग सर्व जगभर पोहोचला आहे. आज जगातील १४० पेक्षा जास्त देशात योग दिवस साजरा केला जात आहे. आपला भारत देश लवकरच विश्वगुरू व्हावा अशी प्रार्थना मी करते व पंतप्रधान मोदी यांचे हार्दिक अभिनंदन करते. या प्रसंगी पतंजली परिवारातील योगतज्ञ दिलीप मते यांनी योगासने व प्राणायामचा सराव बंदी बांधवांकडून करून घेतला. आहार-विहार यांची सविस्तर माहिती दिली. डॉ. सुधा कांकरिया यांनी राजयोगा जीवन पद्धतीचे महत्त्व सांगून बंदी बांधवांकडून मेडिटेशन करून घेतले. कर्मयोगाची सविस्तर माहिती सांगितली.

अधीक्षक संतोष कवार म्हणाले, बंदी बांधवांनी योगा, राजयोगाचा दैनंदिन सराव करावा व आपले तन-मन सशक्त करावे. अशा प्रकारचे कार्यक्रम मानसिक शांतता देऊन जातात. संकटांवर मात करण्याचे बळ देतात. रोटरीच्या वतीने सुहास क्षीरसागर यांनी स्वागत केले. सचिव संदीप ठोंबे यांनी आभार मानले. या प्रसंगी वरीष्ठ तुरूंग अधिकारी विजय सोळंके यांचे सहकार्य लाभले.

# महेश नवमीनिमित्ताने श्री माहेश्वरी युवक मंडळाकडून विविध स्पर्धांचे आयोजन

नगर – श्री माहेश्वरी युवक मंडळ, अहिल्यानगर यांच्यावतीने महेश नवमीनिमित्त युवक, महिला व बालकांमधील कला, क्रीडा आणि बौद्धिक गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांना समाजबांधवांचा प्रतिसाद लाभला असून विविध गटांतील विजेत्यांचा गौरव करण्यात आला.

बॅडमिंटन स्पर्धेला खेळाडूंचा मोठा प्रतिसाद मिळाला. काबरा परिवार यांच्या प्रायोजकत्वाखाली झालेल्या या स्पर्धेत शटल स्मॅशर संघाने विजेतेपद पटकावले, तर निंजा डिफेंडर संघ उपविजेता ठरला. यावेळी प्रोजेक्ट चेअरमन सिद्धार्थ झंवर, सी.ए. प्रणव बिहाणी, गोविंदा काकाणी व गोविंद दरक उपस्थित होते.

इंद्रप्रस्थ मंगल कार्यालय येथे गायन, संगीत वाद्य व भजन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्व. ताराबाई श्रीनिवास झंवर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ श्रीनिवास बाबूलाल झंवर यांनी या स्पर्धांचे प्रायोजकत्व स्वीकारले होते. १६ वर्षांखालील गायन स्पर्धेत आर्या अमित सोनी हिने प्रथम क्रमांक मिळविला, तर रियांशी साजन राठी उपविजेती ठरली. १६ वर्षांवरील गायन स्पर्धेत रिया किरण मणियार हिने विजेतेपद मिळविले. चेतना रविकांत काबरा व रचेत रविकांत काबरा यांनी अनुक्रमे उपविजेतेपद मिळविले. दुहेरी गट गायन स्पर्धेत नेहा नितीन बजाज व प्रिशा अनुप सोनी या जोडीने बाजी मारली.

संगीत वाद्य स्पर्धेत प्रणिका केतन हेडा हिने प्रथम क्रमांक मिळविला. रेवा राहुल झंवर व स्पर्श शैलेश बिहाणी यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. भजन स्पर्धेत शितल परेश बिहाणी यांनी विजेतेपद मिळविले, तर सानिका मधुर बिहाणी तसेच अर्चना सुरेश लड्डा व अर्चना धनेश लड्डा यांनी उपविजेतेपदे मिळविली. या स्पर्धांचे प्रोजेक्ट चेअरमन ऋषि बजाज, भूषण काबरा व गोविंदा जाखोटिया होते.


श्री माहेश्वरी युवक मंडळ आयोजित बुद्धिबळ स्पर्धेत सहभागी स्पर्धक.

महेश मंगल कार्यालय येथे हस्ताक्षर, हस्तकला, चित्रकला व बुद्धिबळ स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. हस्ताक्षर व हस्तकला स्पर्धांना स्व. मुकुंददास खटोड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ खटोड परिवार यांचे प्रायोजकत्व लाभले, तर चित्रकला स्पर्धेसाठी स्व. काशिनाथ बजाज यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बजाज परिवार यांनी सहकार्य केले. संकेत अट्टल, अभिनंदन कालानी व आदित्य काकाणी यांनी ही स्पर्धा यशस्वी केली. हस्ताक्षर, हस्तकला व चित्रकला स्पर्धांच्या विजेत्यांची घोषणा येत्या २८ जून रोजी होणाऱ्या स्नेहमिलन कार्यक्रमात करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

डॉ. कृष्णा व अलका बलदवा यांच्या प्रायोजकत्वाखाली पार पडलेल्या बुद्धिबळ स्पर्धेत महिला गटात ईशानी प्रीतम धूत विजेती व आर्या पंकज लड्डा उपविजेती ठरली. १० वर्षांखालील गटात रुद्रांश शामसुंदर भुतडा याने प्रथम क्रमांक मिळविला. साईश जगदीश भराडिया व विराज श्रावण बिहाणी यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. १८ वर्षांखालील गटात पार्थ नीलमकुमार झंवर विजेता व रमण नितीन लाहोटी उपविजेता ठरला. खुल्या गटात यश दीपक कालिया याने विजेतेपद मिळविले, तर कृष्णा विजय अट्टल उपविजेता ठरला. स्पर्धेचे प्रोजेक्ट चेअरमन मधुर बिहाणी व यश खटोड होते.

युवकांमधील सुप्त कला, क्रीडा आणि बौद्धिक गुणांना योग्य व्यासपीठ मिळावे, समाजातील विविध वयोगटांमध्ये परस्पर संवाद वाढावा आणि सामाजिक ऐक्य अधिक दृढ व्हावे या उद्देशाने श्री माहेश्वरी युवक मंडळाच्या वतीने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. समाजातील लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी या उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, ही बाब समाधानकारक असल्याचे मंडळाचे अध्यक्ष अमित खटोड यांनी सांगितले.

समाजातील नवोदित कलाकार, खेळाडू आणि गुणी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज असून अशा स्पर्धांमधून आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि स्पर्धात्मक वृत्ती विकसित होण्यास मदत होते. भविष्यातही युवक मंडळाच्या माध्यमातून समाजोपयोगी, सांस्कृतिक, शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील विविध उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येतील, असा विश्वासही अमित खटोड यांनी व्यक्त केला.

मंडळाचे अध्यक्ष अमित खटोड यांच्या मार्गदर्शनाखाली पवन बंग, सी.ए. मनीष नावंदर, प्रतीक सारडा, शाम भुतडा, विशाल झंवर, सुमित चांडक, संकेत मानधणे, सी.ए. अनिकेत बलदवा, सुमित बिहाणी, पियुष झंवर आणि वेदांत बजाज यांनी स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

# मुलांनी आई-वडील आणि शिक्षकांचा नेहमी आदर बाळगावा

### डॉ.सौ.मैथिलीताई तांबे यांचे आवाहन; मेहेर इंग्लिश स्कूलला सदिच्छा भेट

नगर – हिंद सेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूलने विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे. यासाठी वर्षभर विविध उपक्रम साजरे केले जातात. तसेच मुलींसाठी ही शाळा सुंदर व सुरक्षित आहे. मुलांनी हसत खेळत शिक्षण घ्यावे. मुलांनी चांगला अभ्यास करून प्रगती साधावी. आई वडील व शाळेच्या नावलौकिकात भर घालावी. मुलांची नेहमीच पालकांकडे काही गोष्टींची मागणी असते. पालक मुलांच्या मागण्या पूर्ण करतात. परंतु पालकांनी दिलेल्या गोष्टींचा गैरवापर मुलांनी करू नये. तसेच मुलांनी आई-वडिलांवर निरपेक्ष प्रेम करावे. त्यांना तुमच्याकडून कोणतीच अपेक्षा नाही. मुलांनी नेहमी चांगला विचार करावा. आई-वडील हे नेहमीच मुलांच्या हितासाठी व त्यांच्या शिक्षणासाठी व त्यांना घडविण्यासाठी कष्ट घेत असतात. मुलांनी नेहमी सकारात्मक विचार करावा. आई वडील व शिक्षक यांचा नेहमी आदर बाळगावा, असे प्रतिपादन संगमनेर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा डॉ.सौ.मैथिली सत्यजीत तांबे यांनी केली आहे.


हिंदसेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये डॉ.सौ.मैथिली तांबे यांनी सदिच्छा भेट दिली.

हिंदसेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये डॉ. सौ.मैथिली तांबे यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी राजमाता जिजाऊ यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. व शाळेतील मुलींशी मनसोक्त गप्पा मारल्या. याप्रसंगी प्राचार्या अनुरीता झगडे व शाळेतील शिक्षिका व विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

शाळेला डॉ.सौ.मैथिलीताई तांबे यांनी भेट दिल्याने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी प्राचार्य अनुरीता झगडे म्हणाले, राजमाता जिजाऊंनी छत्रपती शिवाजी महाराज यांना बालवयापासून चांगले संस्कार दिल्याने हिंदवी स्वराज्याचे निर्माण झाले आहे. आजही देशात आदर्श नागरिक घडविण्यासाठी राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची गरज आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी हिंदसेवा मंडळाचे सर्व पदाधिकारी व शाळेचे चेअरमन जगदीश झालानी हे प्रयत्नशील असतात. यावेळी सूत्रसंचालन उषा भालेराव यांनी केले. प्राचार्य अनुरीता झगडे यांनी आभार मानले.


शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश देवस्थानच्या वतीने शिशु संगोपन संस्थेच्या सविता रमेश फिरोदिया प्रशालेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप म्हणून वह्यांचे वाटप करण्यात आले.

# सविता रमेश फिरोदिया प्रशालेतील विद्यार्थ्यांना श्री विशाल गणेश मंदिराच्यावतीने वह्यांचे वाटप

नगर – शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश देवस्थानच्या वतीने शिशु संगोपन संस्थेच्या सविता रमेश फिरोदिया प्रशालेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप म्हणून वह्यांचे वाटप करण्यात आले.

यावेळी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, विश्वस्त पांडुरंग नन्नवरे, चंद्रकांत फुलारी, माणिकराव विधाते, नितीन पुंड, गणेश राऊत, संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा, व्हा. चेअरमन दशरथ खोसे, सहसचिव राजेश झालानी, एल के आव्हाड, बन्सी नन्नवरे, विनोद कटारिया, माध्य.मुख्याध्यापक दत्तात्रय कजबे, प्राथ. मुख्याध्यापिका योगिता गांधी उपस्थित होते.

प्रास्ताविक मुख्याध्यापिका योगिता गांधी यांनी केले, तर सूत्रसंचालन अनिता बेरड यांनी केले. आशा रोकडे यांनी आभार मानले.


Finvestwala Key Financial Services Pvt. Ltd. तर्फे १५, १६ व १७ जून रोजी Hotel Sanjog येथे तीन दिवसीय शेअर मार्केट व भांडवली बाजार (Capital Market) कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

# फिनव्हेस्टवालातर्फे तीन दिवसीय शेअर मार्केट कार्यशाळेस प्रतिसाद

नगर – Finvestwala Key Financial Services Pvt. Ltd. तर्फे १५, १६ व १७ जून रोजी Hotel Sanjog येथे तीन दिवसीय शेअर मार्केट व भांडवली बाजार (Capital Market) कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला गुंतवणूक, वित्तीय साक्षरता आणि शेअर बाजाराविषयी जाणून घेण्याची उत्सुकता असलेल्या नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यशाळेस १०० हून अधिक सहभागींची नोंदणी झाली होती. कार्यशाळेदरम्यान भांडवली बाजाराशी संबंधित विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये प्राथमिक व दुय्यम बाजारपेठ, शेअर बाजाराची कार्यपद्धती, ETF, म्युच्युअल फंड, बाँड्स, मार्केट इंडेक्स, मूलभूत विश्लेषण (Fundamental Analysis), विविध आर्थिक गुणोत्तरांचे (Financial Ratios) महत्त्व तसेच गुंतवणुकीच्या प्रभावी रणनीती यांचा समावेश होता.

या कार्यशाळेत सीए पवनकुमार दरक यांनी सहभागींचे मार्गदर्शन केले. त्यांनी शेअर बाजारातील गुंतवणुकीची मूलभूत तत्त्वे, संपत्ती निर्मितीचे मार्ग आणि सुजाण गुंतवणुकीचे महत्त्व याविषयी सोप्या व व्यावहारिक पद्धतीने माहिती दिली. संवादात्मक सत्रे, प्रत्यक्ष उदाहरणे आणि विविध उपक्रमांमुळे सहभागींचा उत्साह अधिक वाढला.

यावेळी बोलताना सीए पवनकुमार दरक यांनी आर्थिक साक्षरता आणि शिस्तबद्ध गुंतवणूक ही दीर्घकालीन आर्थिक प्रगतीची गुरुकिल्ली असल्याचे सांगितले. सहभागींनी कार्यशाळेला उत्कृष्ट प्रतिसाद देत मिळालेले ज्ञान भविष्यातील गुंतवणूक निर्णयांमध्ये उपयोगी पडणार असल्याचे मत व्यक्त केले.

अशा प्रकारच्या उपक्रमांद्वारे गुंतवणूकदारांमध्ये जागरूकता निर्माण करून आर्थिकदृष्ट्या सक्षम समाज घडविण्याचा संकल्प फिनव्हेस्टवाला की फायनान्शियल सर्व्हिसेस प्रा. लि. यांनी व्यक्त केला.

# आदिवासी समाजातील एकही कुटुंब योजनांपासून वंचित राहणार नाही

### जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे प्रतिपादन

नगर – भटके विमुक्त व आदिवासी समाजातील एकही कुटुंब शासनाच्या कल्याणकारी योजनांपासून वंचित राहणार नाही. समाजाच्या मूलभूत प्रश्नांवर प्रशासन सकारात्मक भूमिका घेऊन तातडीने कार्यवाही करेल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी केले.


अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात भटके विमुक्त आदिवासी संयोजन समितीच्या प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी चर्चा केली.

अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात भटके विमुक्त आदिवासी संयोजन समिती, विविध सामाजिक संघटना आणि समाज प्रतिनिधींसोबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत भटके विमुक्त व पारधी समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीस आदिवासी युवा क्रांती संघटना महाराष्ट्रचे अजित भोसले, भटके विमुक्त आदिवासी संयोजन समितीच्या उमाताई जाधव व संतोष भोसले, पारधी विकास कृती समितीचे विशाल पवार व तुकाराम पवार, ग्रामीण विकास केंद्रच्या शितल काळे तसेच सहारा सर्वांगीण विकास संस्थेसह विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी अतिक्रमित घराखालची जागा नियमानुसार संबंधित कुटुंबांच्या नावावर करण्याबाबत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली. तसेच राजूर येथील आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शेळी गट योजनेचा लक्षांक वाढवून अधिकाधिक लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्याबाबत चर्चा करण्यात आली.

स्वाभिमान सबलीकरण योजना पुन्हा सक्रिय करण्याबाबतही सकारात्मक निर्णय घेण्यात आला. तसेच जमीन मिळालेल्या लाभार्थ्यांना विहीर, शेततळे आणि इतर कृषी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

लोणी व्यंकनाथ येथील खामकरवाडी परिसरातील पारधी समाजासाठी स्वतंत्र स्मशानभूमी उपलब्ध करून देण्याबाबतही प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला. याशिवाय जातीचे दाखले, रेशन कार्ड, आधार कार्ड यांसारखी आवश्यक कागदपत्रे गृहचौकशीच्या आधारे सुलभ पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा झाली.

या बैठकीसंदर्भात यापूर्वी आदिवासी युवा क्रांती संघटनेचे अजित भोसले यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले होते. त्यानुसार दुपारी १ वाजता सुमारे एक तास ही बैठक पार पडली.

बैठकीस वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते अरुण आबा जाधव, नरसिंग भोसले, चेअरमन राहुल भोसले, सुरेश काळे, सचिन काळे, रामसिंग भोसले, बसीर मदारी, रोशन मदारी, जकीर मदारी आदी उपस्थित होते.

भटके विमुक्त व आदिवासी समाजाच्या मूलभूत प्रश्नांबाबत जिल्हा प्रशासनाने घेतलेल्या सकारात्मक भूमिकेमुळे समाजात समाधान व्यक्त करण्यात येत असून, आगामी काळात विविध शासकीय योजनांचा लाभ मोठ्या प्रमाणात समाजापर्यंत पोहोचेल, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# अर्थजगत

आपण निवडलेला म्युच्युअल फंड योग्य पद्धतीने गुंतवणूक करत आहे की नाही, हे केवळ त्याच्या वरवरच्या परताव्यावरून (रिटर्न्स) समजू शकत नाही. अनेकदा एखादा फंड तेजीच्या काळात चांगली कामगिरी करतो, परंतु फंड मॅनेजर खरोखरच योग्य रणनीती वापरत आहेत की अवाजवी जोखीम घेत आहेत, हे ओळखण्यासाठी काही पडद्यामागील संकेतांचा अभ्यास करावा लागतो.

## तुमचा फंड योग्य प्रकारे गुंतवणूक करतोय का?

■ अर्थसल्ला




**१ स्टाईल ड्रिफ्ट आणि मँडेटचे उल्लंघन :** गुंतवणूकदारांना फारशी माहीत नसलेली ही त्रुटी आहे. समजा तुम्ही एखाद्या स्मॉल कॅप फंडात गुंतवणूक केली आहे, परंतु बाजारात मंदी आल्यावर फंड मॅनेजरने स्वतःचे अपयश लपवण्यासाठी लार्ज कॅप किंवा मिडकॅप शेअर्स मोठ्या प्रमाणावर खरेदी केले, तर त्याला 'स्टाईल ड्रिफ्ट' म्हणतात. फंड आपल्या मूळ उद्दिष्टापासून (मँडेट) भरकटत आहे की नाही, हे तपासण्यासाठी त्याच्या मासिक पोर्टफोलिओमधील शेअर्सच्या मार्केट कॅपची टक्केवारी नियमितपणे तपासली पाहिजे.

**२ डाऊनसाइड कॅप्चर रेशो :** जेव्हा बाजार वाढतो, तेव्हा सर्वच फंड वाढतात. परंतु फंडाची खरी ताकद बाजार घसरताना समजते. डाऊनसाइड कॅप्चर रेशो हा छुपा इंडिकेटर बाजार घसरल्यावर तुमचा फंड किती सुरक्षित होता हे दर्शवतो. हा रेशो १०० पेक्षा कमी असेल (उदा. ८०), तर त्याचा अर्थ असा की जेव्हा बेंचमार्क इंडेक्स १०० रुपये घसरला, तेव्हा तुमचा फंड केवळ ८० रुपये घसरला. हा रेशो जितका कमी, तितका तुमचा फंड आणि त्याचे मॅनेजमेंट उत्तम.

**३ पोर्टफोलिओ टर्नओव्हर रेट :** हा दर फंड मॅनेजर शेअर्सची खरेदी-विक्री किती वेगाने करत आहेत हे दर्शवतो. जर एखाद्या फंडाचा टर्नओव्हर रेट १०० टक्क्यांपेक्षा जास्त असेल, तर याचा अर्थ असा की फंड मॅनेजर शेअर्सवर दीर्घकालीन विश्वास न ठेवता सतत ट्रेडिंग करत आहेत. उच्च टर्नओव्हर रेटमुळे व्यवहार खर्च (ट्रान्झॅक्शन कॉस्ट) वाढतो. याचा थेट फटका तुमच्या परताव्याला बसतो. स्थिर आणि योग्य प्रक्रियेने चालणाऱ्या फंडाचा टर्नओव्हर रेट सामान्यतः कमी असतो.

**४ अल्फा आणि शार्प रेशो :** केवळ परतावा पाहण्याऐवजी 'जोखीम-समायोजित परतावा' (रिस्क अॅडजेस्टमेंट रिटर्नस) पाहणे गरजेचे आहे. तुमचा फंड त्याच्या बेंचमार्कपेक्षा किती अतिरिक्त परतावा मिळवून देत आहे, हे अल्फा दर्शवतो. पॉझिटिव्ह अल्फा (उदा. +२ किंवा +३) असणे म्हणजे फंड मॅनेजर आपल्या कौशल्याने बाजारापेक्षा जास्त नफा कमवत आहेत. फंडाने घेतलेल्या प्रत्येक युनिट जोखमीच्या बदल्यात किती परतावा दिला, हे शार्प रेशोवरून समजते. उच्च शार्प रेशो असलेला फंड नेहमीच गुंतवणुकीसाठी योग्य मानला जातो.

**५ कॅश होल्डिंग आणि कॉन्सन्ट्रेशन रिस्क :** फंड मॅनेजरकडे आलेला पैसा ते कुठे ठेवतात, यावर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. जर फंडाच्या पोर्टफोलिओमध्ये 'कॅश' (रोख रक्कम) चे प्रमाण अचानक १० ते १५ टक्क्यांपेक्षा जास्त वाढले, तर याचा अर्थ फंड मॅनेजरला बाजारात नवीन गुंतवणूक करण्यासाठी योग्य शेअर्स सापडत नाहीत किंवा ते बाजाराबाबत साशंक आहेत. तसेच, फंडाने केवळ अव्वल ५ ते १० शेअर्समध्येच ४०% पेक्षा जास्त भांडवल गुंतवले असेल, तर तिथे कॉन्सन्ट्रेशन रिस्क वाढते.

थोडक्यात सांगायचे तर, केवळ स्टार रेटिंग किंवा गेल्या वर्षीचा परतावा पाहून गुंतवणूक ठरवू नका. वरील तांत्रिक निकषांची त्रैमासिक किंवा सहामाही आधारावर पडताळणी केल्यास, आपला म्युच्युअल फंड योग्य मार्गावर आहे की नाही याचे अचूक आणि वास्तविक चित्र समोर येते. ◆◆◆

## ५४ एफची सवलत अनेक घरांसाठी घेता येते?

**आयकर कायद्याच्या कलम ५४एफ (आता नवीन आयकर कायदा २०२५ अंतर्गत कलम ८६) नुसार, निवासी घराव्यतिरिक्त इतर कोणत्याही दीर्घकालीन भांडवली मालमत्तेच्या (जसे की शेअर्स, सोने किंवा जमीन) विक्रीतून मिळालेल्या नफ्यावर कर सवलत मिळते. अनेक करदात्यांच्या मनात हा प्रश्न येतो की एकापेक्षा जास्त घरे खरेदी करताना ही कर सवलत वारंवार किंवा एकाच वेळी अनेक घरांसाठी घेता येते का, तर याचे उत्तर काही अटींवर अवलंबून आहे.**

■ धोरण




**जर करदात्याने यांपैकी कोणत्याही एका अटीचे उल्लंघन केले, म्हणजेच तीन वर्षांच्या आत ते घर विकले किंवा ठरलेल्या मुदतीत दुसरे घर खरेदी केले, तर पूर्वी मिळालेली सर्व कर सवलत रद्द केली जाते. अशा परिस्थितीत, ती सवलतीची रक्कम ज्या वर्षी अटींचे उल्लंघन झाले आहे, त्या आर्थिक वर्षात 'दीर्घकालीन भांडवली नफा' म्हणून करपात्र धरली जाते आणि त्यावर नियमांनुसार कर आकारला जातो. सद्यस्थितीनुसार या सवलतीची कमाल मर्यादा १० कोटी रुपये निश्चित करण्यात आली आहे.**

कलम ५४एफ अंतर्गत मिळणारी ही सवलत एकाच वेळी अनेक घरे खरेदी करण्यासाठी किंवा बांधण्यासाठी वापरता येत नाही, कारण या कलमाचा मुख्य उद्देश केवळ एकाच निवासी घरात गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन देणे हा आहे. मालमत्तेच्या विक्रीतून मिळालेली संपूर्ण रक्कम (निव्वळ मोबदला) केवळ एकाच निवासी घरामध्ये गुंतवणे कायदेशीररित्या बंधनकारक आहे. जर करदात्याने मिळालेली रक्कम विभागून वेगवेगळ्या घरांमध्ये गुंतवली, तर त्याला या कलमाचा लाभ मिळणार नाही.

तथापि, जर एखादी व्यक्ती वेगवेगळ्या आर्थिक वर्षांत वेगवेगळ्या मालमत्तांची विक्री करत असेल आणि प्रत्येक वेळी स्वतंत्रपणे नवीन घर खरेदी करत असेल, तर ती व्यक्ती एकापेक्षा जास्त वेळा या सवलतीचा दावा करू शकते. परंतु, असे करताना प्रत्येक व्यवहार स्वतंत्र असावा लागतो आणि प्रत्येक व्यवहाराच्या वेळी कायद्यातील सर्व अटींचे तंतोतंत पालन करणे आवश्यक असते.

या सवलतीचा लाभ घेण्यासाठी काही अतिशय कडक कायदेशीर अटी निश्चित करण्यात आल्या आहेत. पहिली अट अशी आहे की, ज्या दिवशी मूळ मालमत्तेची विक्री केली जाते, त्या दिवशी करदात्याच्या नावावर आधीपासून एकापेक्षा जास्त निवासी घरे नसावीत. म्हणजेच, आधीच दोन किंवा अधिक घरांचे मालक असणारे करदाते या सवलतीसाठी पात्र ठरत नाहीत.

दुसरी अट वेळेच्या मर्यादेशी संबंधित आहे, ज्यानुसार मालमत्ता विक्रीच्या तारखेपासून एक वर्ष आधी किंवा दोन वर्षांच्या आत नवीन घर खरेदी करणे आवश्यक आहे. जर नवीन घर बांधायचे असेल, तर मालमत्ता विक्रीच्या तारखेपासून तीन वर्षांच्या आत त्याचे बांधकाम पूर्ण होणे गरजेचे आहे. जर करदाता या ठरवून दिलेल्या मुदतीत संपूर्ण रक्कम नवीन घरात गुंतवू शकला नाही, तर त्याला ती रक्कम आयकर विभागाच्या 'कॅपिटल गेन्स अकाउंट स्कीम' मध्ये जमा करावी लागते.

तिसरी महत्त्वाची अट भविष्यातील मालमत्ता खरेदीवर मर्यादा घालते. एकदा या कलमांतर्गत सवलत घेतल्यानंतर, करदात्याने मूळ मालमत्ता विकल्याच्या तारखेपासून पुढील दोन वर्षांच्या आत इतर कोणतेही नवीन घर खरेदी करू नये किंवा पुढील तीन वर्षांच्या आत दुसरे कोणतेही घर बांधू नये. तसेच, ज्या नवीन घरासाठी कर सवलत घेतली आहे, ते घर खरेदी केल्यापासून किंवा बांधकाम पूर्ण झाल्यापासून पुढील तीन वर्षांपर्यंत विकता येत नाही. ◆◆◆

■ गुंतवणूक



## गुंतवणूक आणि संपत्तीनिर्मिती

**संपत्ती निर्माण करण्यासाठी रिअल इस्टेट, सोने आणि इक्विटी (शेअर बाजार) हे तीन पारंपरिक आणि अत्यंत लोकप्रिय पर्याय मानले जातात. प्रत्येक मालमत्ता प्रकाराची स्वतःची वैशिष्ट्ये, फायदे आणि जोखीम असतात. त्यामुळे गुंतवणूकदाराने आपल्या आर्थिक उद्दिष्टांनुसार योग्य निवड करणे आवश्यक आहे.**

रिअल इस्टेट हा भारतातील सर्वात पसंतीचा आणि सुरक्षित मानला जाणारा पर्याय आहे. यात गुंतवणूक केल्यास गुंतवणूकदाराला भाड्याच्या स्वरूपात नियमित उत्पन्न मिळते आणि दीर्घकाळात मालमत्तेचे मूल्यही मोठ्या प्रमाणात वाढते.

रिअल इस्टेटमध्ये मोठी गुंतवणूक करावी लागते आणि ही मालमत्ता गरजेच्या वेळी लगेच विकणे कठीण असते. परंतु, ज्यांना स्थिर आणि सुरक्षित संपत्ती निर्माण करायची आहे, त्यांच्यासाठी हा एक उत्तम पर्याय आहे.

इक्विटी म्हणजेच शेअर बाजार आणि म्युच्युअल फंड हा दीर्घकाळात सर्वात जलद गतीने आणि सर्वाधिक परतावा देणारा पर्याय ठरला आहे. सुरेश मनशरामानी यांच्या मते, जर तुम्हाला कमी कालावधीत किंवा चक्रवाढ पद्धतीने प्रचंड संपत्ती निर्माण करायची असेल, तर इक्विटी हा सर्वोत्तम मार्ग आहे. यात रिअल इस्टेटसारखी मोठी रक्कम एकदम गुंतवण्याची गरज नसते; तुम्ही अगदी लहान रकमेपासून किंवा एसआयपीच्या माध्यमातून गुंतवणूक सुरू करू शकता. इक्विटीमध्ये प्रचंड तरलता असते, ज्यामुळे तुम्ही कधीही तुमचे शेअर्स विकून पैसे मिळवू शकता. मात्र, यात बाजारातील चढ-उतारांमुळे जोखीम जास्त असते.

अंतिमतः असे म्हणता येईल की, कोणत्याही एकाच पर्यायावर पूर्णपणे अवलंबून राहण्याऐवजी गुंतवणूकदारांनी आपल्या पोर्टफोलिओमध्ये विविधता आणली पाहिजे. केवळ नोकरी करून किंवा एकाच ठिकाणी पैसे ठेवून कोणीही करोडपती बनू शकत नाही, त्यासाठी योग्य ठिकाणी विचारपूर्वक गुंतवणूक करणे आवश्यक आहे. तरुण वयात आणि जास्त जोखीम घेण्याची क्षमता असताना इक्विटीला प्राधान्य द्यावे, तर स्थिरता आणि सुरक्षिततेसाठी रिअल इस्टेट आणि सोन्याचा आधार घ्यावा, जेणेकरून दीर्घकालीन संपत्ती निर्मितीचे उद्दिष्ट साध्य करता येईल. ◆◆◆

**सोने हा भारतीयांच्या जिव्हाळ्याचा आणि संकटकाळातील सर्वात भरवशाचा सोबती मानला जातो. मनशरामानी सांगतात की, सोने हा संपत्ती वाढवण्याचा मुख्य स्रोत नसून ती सुरक्षित ठेवण्याचे एक उत्तम साधन आहे. जेव्हा जेव्हा शेअर बाजारात मंदी येते किंवा जागतिक स्तरावर भू-राजकीय तणाव निर्माण होतो, तेव्हा सोन्याच्या किमती वेगाने वाढतात. महागाईविरुद्ध लढण्यासाठी आणि पोर्टफोलिओ संतुलित ठेवण्यासाठी सोन्यामध्ये ठराविक प्रमाणात गुंतवणूक असणे अत्यंत फायदेशीर ठरते.**



## सेमीकंडक्टर क्षेत्रातील समभागांत गुंतवणूक करायचीय?

भारतात सेमीकंडक्टर परिसंस्थेचा वेगाने विस्तार होत असून, केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक उत्पादनांना प्रोत्साहन देणाऱ्या धोरणांमुळे या क्षेत्राला मोठी गती मिळत आहे. आगामी ६ ते ८ महिन्यांच्या गुंतवणुकीचा दृष्टिकोन ठेवून या क्षेत्रातील मजबूत फंडामेंटल्स असलेल्या कंपन्यांच्या शोधात असाल तर शेअर बाजार अभ्यासक सिद्धार्थ सेदानी यांनी काही समभाग सुचवले आहेत. यामध्ये पहिली कंपनी सीजी पॉवर असून या सेमीकंडक्टर बास्केटमध्ये या शेअरला २५ टक्के वाटा देण्याचा सल्ला देण्यात आला आहे. मुरुगप्पा समूहाची कंपनी असलेली सीजी पॉवर ही गुजरातच्या साणंद येथे रेनेसास इलेक्ट्रॉनिक्स आणि स्टार्स मायक्रोइलेक्ट्रॉनिक्सच्या सहकार्याने सेमीकंडक्टर असेंब्ली, टेस्टिंग आणि पॅकेजिंग क्षेत्रात मोठी गुंतवणूक करत आहे. ६ ते ८ महिन्यांच्या कालावधीसाठी या शेअरचे उद्दिष्ट ८२० रुपये निश्चित करण्यात आले आहे.

दुसरी कंपनी केइआयज इंडस्ट्रीज असून या थीम आधारित पोर्टफोलिओमध्ये या कंपनीलाही २५ टक्के वाटा देण्याची शिफारस करण्यात आली आहे. सेमीकंडक्टर उत्पादन प्रकल्पांसाठी लागणाऱ्या विशेष प्रकारच्या केबल्सच्या पुरवठ्यात कंपनीची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार असून कंपनीची ऑर्डर बुक अत्यंत मजबूत आहे. आगामी ६ ते ८ महिन्यांसाठी या शेअरचे उद्दिष्ट ४,७९० रुपये देण्यात आले आहे.

तिसरी कंपनी टाटा इलेक्सी असून या बास्केटमध्ये या शेअरला २५ टक्के वेटेज देण्यात आले आहे. ही कंपनी सेमीकंडक्टर डिझाईन, एम्बेडेड सिस्टीम्स आणि सॉफ्टवेअर क्षेत्रात जागतिक स्तरावर आघाडीवर असून ऑटोमोटिव्ह व तंत्रज्ञान क्षेत्रातील चिप डिझाईनमध्ये तिचा मोठा वाटा आहे. या शेअरसाठी ७,९०० रुपयांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

चौथी कंपनी डिक्सन टेक्नॉलॉजीज असून पोर्टफोलिओ संतुलित राखण्यासाठी या इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील दिग्गज कंपनीला उर्वरित २५ टक्के वाटा देण्यात आला आहे. भारतातील देशांतर्गत इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील ही सर्वात मोठी कंपनी असून स्थानिक पातळीवर सेमीकंडक्टर चिप्स उपलब्ध झाल्यास कंपनीच्या नफ्यात प्रचंड वाढ होण्याची शक्यता आहे. पुढील ६ ते ८ महिन्यांसाठी या शेअरचे उद्दिष्ट ९,७७० रुपये ठेवण्यात आले आहे. ◆◆◆

## विविधीकरणाचे वास्तव

रॉबर्ट कियोसाकी यांनी गुंतवणूक विश्वातील 'विविधीकरण' म्हणजेच डायव्हर्सिफिकेशनच्या प्रचलित संकल्पनेवर जोरदार टीका केली आहे. 'रिच डॅड पुअर डॅड' या जगप्रसिद्ध पुस्तकाचे लेखक असलेल्या कियोसाकी यांनी गुंतवणूकदारांना सावध करण्यासाठी 'डी-वॉरसिफायड' हा नवीन शब्द तयार केला आहे. पारंपरिक आर्थिक सल्लागार नेहमीच गुंतवणूकदारांना जोखीम कमी करण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी पैसे गुंतवण्याचा सल्ला देतात. मात्र, सध्याच्या आधुनिक आर्थिक रचनेत हे विविधीकरण गुंतवणूकदारांना सुरक्षित ठेवण्याऐवजी अधिक धोक्यात आणत आहे, असा दावा कियोसाकी यांनी केला आहे. त्यांच्या मते, बहुतांश लोक विविधीकरणाच्या नावाखाली एकाच प्रकारच्या आर्थिक जाळ्यात अडकत चालले आहेत.




या धोक्याचे विश्लेषण करताना त्यांनी 'कागदी मालमत्ता' आणि एक्सचेंज ट्रेडेड फंडस् यांच्यावर विशेष निशाणा साधला आहे. आजचे गुंतवणूकदार आपल्याला सोने, चांदी, बिटकॉईन, तेल, रिअल इस्टेट किंवा शेअर्स अशा विविध क्षेत्रांचा लाभ मिळत आहे असे समजून गुंतवणूक करतात. परंतु, ही गुंतवणूक थेट त्या मूळ घटकांमध्ये नसून, ईटीएफ किंवा विविध फंडांच्या माध्यमातून कागदावर किंवा डिजिटल स्वरूपात केली जाते. हे ईटीएफ म्हणजे केवळ मूळ मालमत्तेच्या किमतीचा मागोवा घेणारी वित्तीय उत्पादने किंवा डेरिव्हेटिव्हज आहेत.

■ सल्ला मोलाचा

जेव्हा संपूर्ण आर्थिक व्यवस्थेवर संकट येते, तेव्हा या कागदी मालमत्तांचे मूल्य वेगाने शून्य होऊ शकते, कारण गुंतवणूकदाराचा त्या मूळ मालमत्तेवर थेट अधिकार नसतो. वित्तीय मध्यस्थ आणि फंड मॅनेजर्सच्या हातात संपूर्ण नियंत्रण सोपवणे अत्यंत धोकादायक ठरू शकते.

या आर्थिक संकटापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी कियोसाकी यांनी थेट मालकी हक्क असलेल्या प्रत्यक्ष मालमत्तांवर भर देण्याचा सल्ला दिला आहे. गुंतवणूकदारांनी अशा घटकांमध्ये भांडवल गुंतवावे ज्यांना ते प्रत्यक्ष पाहू शकतात, स्पर्श करू शकतात आणि जे त्यांच्या पूर्णपणे नियंत्रणात आहेत. यामध्ये प्रत्यक्ष भौतिक सोने आणि चांदीची नाणी किंवा विटा स्वतःच्या ताब्यात ठेवणे, थेट रिअल इस्टेट किंवा जमिनीची खरेदी करणे आणि बिटकॉईन देखील कोणत्याही एक्सचेंजवर न ठेवता स्वतःच्या सुरक्षित वैयक्तिक वॉलेटमध्ये साठवणे समाविष्ट आहे.

एखादी व्यक्ती अशा प्रत्यक्ष मालमत्तेची मालकी स्वतःकडे ठेवते, तेव्हा वित्तीय संस्था किंवा बाजारातील अस्थिरतेचा तिच्यावर थेट परिणाम होत नाही. त्यामुळे कागदी गुंतवणुकीच्या आभासी दुनियेतून बाहेर पडून गुंतवणूकदारांनी खऱ्या आणि भौतिक मालमत्तांकडे वळणे काळाची गरज बनली आहे. ◆◆◆



## अमेरिकेतील पाल्याला पैसे पाठवताय?


अमेरिकेत राहणाऱ्या आपल्या मुलाला किंवा मुलीला पैसे भेट म्हणून देताना भारतीय आणि अमेरिकन कर नियमांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. भारताच्या आयकर कायदा १९६१ मधील कलम ५६(२)(क्ष) नुसार आई-वडिलांकडून मुलांना मिळालेली भेटवस्तू किंवा रक्कम ही पूर्णपणे करमुक्त असते, कारण मुले ही 'नातेवाईक' या व्याख्येत येतात. मात्र, ही रक्कम लिबरलाइज्ड रेमिटन्स स्कीम म्हणजेच एलआरएस अंतर्गत बँक खात्याद्वारेच पाठवणे बंधनकारक आहे. भारतामध्ये एका आर्थिक वर्षात १० लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कम पाठवल्यास त्यावर २० टक्के दराने स्त्रोतावर कर गोळा म्हणजेच टीसीएस केला जातो.

भारतात हा व्यवहार जरी करमुक्त असला तरी अमेरिकेत मात्र याचे कडक नियम आहेत. जर अमेरिकेत राहणाऱ्या व्यक्तीला परदेशी नागरिक किंवा पालकांकडून एका कॅलेंडर वर्षात (१ जानेवारी ते ३१ डिसेंबर) एकूण १,००,००० डॉलर्सपेक्षा जास्त रक्कम भेट म्हणून मिळाली, तर त्याची माहिती तिथल्या इंटरनल रेव्हेन्यू सर्व्हिस अर्थात आयआरएस कडे फॉर्म ३५२० भरून देणे बंधनकारक आहे. हा फॉर्म केवळ माहिती देण्यासाठी असतो आणि त्यावर कोणताही कर आकारला जात नाही.

**अनेक कुटुंबे कर आकारला जात नसल्यामुळे या फॉर्मकडे दुर्लक्ष करतात, परंतु विहित मुदतीत फॉर्म ३५२० न भरल्यास मोठा दंड होऊ शकतो. हा दंड दर महिन्याला एकूण रकमेच्या ५ टक्के या दराने आकारला जातो आणि तो कमाल २५ टक्क्यांपर्यंत जाऊ शकतो. उदाहरणार्थ, जर एखाद्या पालकाने २,५०,००० डॉलर्स भेट म्हणून दिले आणि त्याची माहिती वेळेत दिली नाही, तर तब्बल ६२,५०० डॉलर्सचा दंड होऊ शकतो. भारत आणि अमेरिका यांच्यात कोणताही इस्टेट किंवा गिफ्ट टॅक्स करार नसल्यामुळे बँक आणि दोन्ही देशांतील कर अधिकाऱ्यांसाठी एक साधा 'गिफ्ट डीड' म्हणजेच भेटनामा तयार करणे योग्य ठरते, ज्यामध्ये देणारा, घेणारा, रक्कम, तारीख आणि हा व्यवहार स्वेच्छेने केला असल्याचा स्पष्ट उल्लेख असावा.** ◆◆◆

**नोकरी बदलताना जुना एम्प्लॉईज प्रॉव्हिडंट फंड नवीन खात्यात ट्रान्सफर न करणे करदात्यांसाठी आर्थिकदृष्ट्या नुकसानकारक ठरू शकते. अनेक कर्मचारी याकडे एक साधी प्रक्रिया म्हणून दुर्लक्ष करतात, परंतु यामुळे भविष्यात मिळणारे करमुक्त पैसे आणि इतर अनेक लाभ धोक्यात येऊ शकतात.**

## पीएफ ट्रान्स्फर न केल्यास...




आयकर आणि भविष्य निर्वाह निधीच्या नियमांनुसार, पीएफ खात्यातून काढलेली रक्कम पूर्णपणे करमुक्त होण्यासाठी कर्मचाऱ्याची सलग ५ वर्षे सेवा पूर्ण होणे आवश्यक असते. जेव्हा एखादा कर्मचारी नोकरी बदलतो आणि जुन्या खात्यातील रक्कम नवीन कंपनीच्या पीएफ खात्यात ट्रान्सफर करतो, तेव्हा त्याची जुनी सेवा नवीन सेवेमध्ये जोडली जाते. यामुळे ५ वर्षांची निरंतरता कायम राहते.

मात्र, जर जुने खाते ट्रान्सफर न करता तसेच ठेवले, तर त्या कालावधीची गणना खंडित मानली जाते आणि नवीन नोकरीमध्ये ५ वर्षांचा कार्यकाळ पुन्हा शून्य ते सुरू होतो. अशा स्थितीत, जुन्या खात्यातून पैसे काढताना त्यावर १० टक्के (पॅन कार्ड नसेल तर ३० टक्के) टीडीएस आकारला जाऊ शकतो आणि तो संपूर्ण निधी करपात्र ठरतो.

याशिवाय, जुने खाते ट्रान्सफर न करण्याचे इतरही अनेक तोटे आहेत. प्रत्येक नवीन नोकरीत एकाच युनिव्हर्सल अकाउंट नंबर अंतर्गत एक नवीन मेंबर आयडी तयार केला जातो. जर जुने खाते विलीन केले नाही, तर खाते निष्क्रिय होण्याची शक्यता वाढते.

पीएफ ट्रान्सफर करण्याची प्रक्रिया आता पूर्णपणे ऑनलाइन आणि सोपी झाली आहे. कर्मचारी ईपीएफओच्या 'मेम्बर सेवा पोर्टल' वर जाऊन 'वन मेम्बर - वन ईपीएफ अकाउंट' हा पर्याय निवडून ऑनलाईन अर्ज करू शकतात. यासाठी कर्मचाऱ्याचा युएएन आधार कार्डशी लिंक असणे आवश्यक आहे. पोर्टलवर आवश्यक माहिती भरून ओटीपीद्वारे पडताळणी केल्यानंतर, हा अर्ज सध्याच्या किंवा जुन्या कंपनीकडे मंजुरीसाठी जातो. कंपनीने मान्यता दिल्यानंतर ईपीएफओ काही दिवसांत जुने खाते नवीन खात्यात विलीन करते, ज्यामुळे सेवा कालावधी सुरक्षित राहतो आणि भविष्यातील कर सवलतीचा मार्ग मोकळा होतो. ◆◆◆

**निष्क्रिय खात्यांमध्ये अनेकदा व्याज मिळणे बंद होते किंवा त्यावर मिळणारे व्याज करपात्र ठरते, ज्यामुळे चक्रवाढ व्याजाचा मिळणारा मोठा फायदा कर्मचारी गमावून बसतात. तसेच, आणीबाणीच्या प्रसंगी पीएफमधून आगाऊ रक्कम किंवा पूर्ण रक्कम काढायची असल्यास, ती केवळ सध्याच्या सक्रिय मेंबर आयडीवरूनच काढता येते, जुन्या खात्यातून नाही.**

